cmyk

## संपादकीय

### बळीराजासाठी संकटपूर्व नियोजनाची गरज...

निसर्गाचे बदलते चक्र किंवा लहरी हवामानाचा मुद्दा अलीकडच्या काही वर्षांत ऐरणीवर आला आहे. मागच्या पाच ते सहा दिवसांपासून महाराष्ट्राच्या काही भागांत होणारा अवकाळी पाऊस व गारपीट, हा त्याचाच नमुना म्हणावा लागेल. नेमेची येतो पावसाळा, असे म्हणतात. त्याला जोडूनच आता 'नेमेची येतो अवकाळी पाऊस' असे म्हणण्यासारखी स्थिती निर्माण व्हावी, यातच सगळे आले. अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३ | रविवार दि.२२ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# पीक नुकसानीचे तातडीने मुल्यांकन!

## केंद्रीय कृषिमंत्र्यांचे निर्देश,अवकाळीचे शेतकऱ्यांवर संकट

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**देशाच्या विविध भागांत गेल्या काही दिवसांत झालेला जोरदार अवकाळी पाऊस, गारपिटीने गहू, हरभरा, मका पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीतील कृषी भवन येथे उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. त्यात शेती क्षेत्राच्या एकूण परिस्थितीचा आणि शेतपिकांच्या संभाव्य नुकसानीचा आढावा घेण्यात आला.**



या बैठकीनंतर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कृषी मंत्रालयाकडून शेतकऱ्यांना तातडीने मदत पुरवणे, विमा दावे निकाली काढणे प्रक्रिया आणि मदत यंत्रणांच्या कार्यपद्धतीबाबत आढावा घेण्यात आला. कृषिमंत्री चौहान यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, सरकारचे लक्ष केवळ उत्पादनावर मर्यादित नाही तर, पीक नुकसानीचे वैज्ञानिकदृष्ट्या मूल्यांकन करून विमा दावे योग्य प्रकारे निकाली काढले जातील आणि शेतकऱ्यांना भरपाई वेळेवर दिली जाईल. यावेळी अनेक राज्यांत ▶▶ पान २ वर

### लवकरच गहू, धानाची खरेदी

पुढील काही दिवसांत गहू आणि धानाची खरेदी सुरू होईल. यंदा रब्बी हंगामात भरघोस उत्पादनाचा अंदाज असल्याने देशात गहू, धान आणि तांदळाची कोणतीही कमतरता जाणवणार नाही. गहू, धान खरेदीसोबतच कडधान्य पिकांवरही केंद्र सरकारचा विशेष भर आहे. तूर, मसूर, उडीद आदी शेतमाल शेतकऱ्यांना जेवढा विकायचा आहे, तितका तो खरेदी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# खरातने मराठवाड्याचे पाणी पळविले

**स्वत:च्या संस्थेसाठी ४८ किमीची पाईपलाईन**

**छ.संभाजीनगर। प्रतिनिधी**

दुष्काळाने होरपळणाऱ्या मराठवाड्यासाठी राखीव असलेले पाणी नाशिक जिल्ह्यातील दारणा प्रकल्पातून भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरातला देण्यात आल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या शिफारशीवरून मिरगाव (ता. सिन्नर) येथील कॅप्टन अशोक खरातच्या शिवनिका संस्थानाला दररोज ३९ लाख लिटर पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयावर ३१ जुलै २०२० रोजी मंत्रिमंडळ उपसमितीने शिक्कामोर्तब करून शासन आदेशही जारी केला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, बलात्कार प्रकरणात अटकेत असलेल्या खरातचे विविध कारनामे आता समोर येत आहेत. मिरगाव येथे उभारलेल्या ▶▶ पान २ वर

# दै.राज्य लोकतंत्रचा ५ वा वर्धापन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**अत्यंत कमी काळात लोकांच्या पसंतीस उतरून अश्वगतीने प्रगती केलेल्या दै.राज्य लोकतंत्रच्या मराठवाडा आवृत्तीचा ५ वा वर्धापन दिन गुढी पाडव्याच्या दिवशी दि.१९ मार्च रोजी बीड येथे अत्यंत उत्साहात साजरा झाला. शहरातील प्रसिद्ध ग्रँड यशोदा येथे सायंकाळी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून हितचिंतक आणि ज्येष्ठांनी दै.राज्य लोकतंत्र वर प्रेम व्यक्त करतांना भरभरून शुभेच्छा देत पुढील यशस्वी वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या.**

दै.राज्य लोकतंत्र हे अल्पावधीत सामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले दैनिक आहे. शेतकऱ्यांना मध्यवर्ती ठेवून दैनिकाने आपली वाटचाल सुरू केली आणि त्यात सातत्य राखले आहे. दै.राज्य लोकतंत्र मराठवाड्यात वितरीत होणारे दैनिक असून, मराठवाड्यासह पुणे येथून स्वतंत्र आवृत्ती काढण्यात येते. मराठवाडा आवृत्तीचा ५ वा वर्धापन दिन पाडव्याच्या दिवशी १९ मार्च रोजी साजरा करण्यात आला. आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठीत नागरीक, ज्येष्ठ नागरीक, विविध संपादक, पत्रकार, डॉक्टर, वकील, इंजिनिअर, अधिकारी आणि सामान्य वाचक शिवाय सामाजिक क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. यामध्ये बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, आयुष्मान भारतचे राज्याचे अध्यक्ष डॉक्टर ओमप्रकाश शेटे, माजी आमदार उषाताई दराडे, सामाजिक कार्यकर्त्या प्राध्यापक सुशिलाताई मोराळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, बीड जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉक्टर आदित्य सारडा, सेनेचे तालुकाध्यक्ष संतोष जाधव, सुनील अनभुले, भाजपाचे युवा नेते डॉ योगेश क्षीरसागर, नगरसेवक शुभम धुत, नगरसेवक अमर नाईकवाडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे, लेखा व वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक ठोंबरे, ज्येष्ठ पत्रकार जगदीश मामा पिंगळे, ज्येष्ठ पत्रकार अशोक आप्पा देशमुख, संपादक नरेंद्र कांकरिया, अतुल कुलकर्णी, संपादक दिलीप खिस्ती, शेख तय्यब, राजेंद्र होळकर, विलास डोळसे, अभिमन्यू घरत, शेख मुजीब, राजेंद्र आगवान, सोमनाथ खताळ, अमोल मुळे, शिरीष शिंदे, नितीन ▶▶ पान २ वर







### दूरध्वनीवरून शुभेच्छा...

जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार,राज्याच्या पर्यावरण मंत्री जालनाच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, माजी मंत्री आ.सुरेश धस, माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर, पाथर्डीच्या आ.मोनिकाताई राजळे, केदारेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन प्रताप काका ढाकणे आदिंनी दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.







# रुपयाच्या घसरणीवरून राहुल गांधींचा केंद्रावर निशाणा

## महागाई वाढण्याचा अंदाज व्यक्त करीत सरकार नियोजनात अपयशी ठरत असल्याची टीका

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

रुपयाची घसरण हे आगामी महागाईचे स्पष्ट संकेत आहेत. पश्चिम आशियातील संकटामुळे उद्धवलेल्या एलपीजी तुटवड्यामुळे देश आर्थिक अडचणींचा सामना करत असताना, केंद्र सरकार केवळ पोकळ गप्पा मारत आहे, अशी टीका लोकसभा विरोधी पक्ष



नेते राहुल गांधी यांनी केली.

विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतीत वाढ केली जाईल, असा दावाही त्यांनी केला आहे.

राहुल गांधी यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, ''रुपया डॉलरच्या तुलनेत कमकुवत होऊन १०० च्या दिशेने वाटचाल करत आहे, तसेच ▶▶ पान २ वर

# मध्य पूर्वेतील हल्ल्यांचा मोदींकडून निषेध



**दिल्ली । वृत्तसंस्था**

अमेरिका–इस्रायल–इराण युद्धाचा दरम्यान २२ व्या दिवशी शनिवारी, पंतप्रधानांनी इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी फोनवर संवाद साधला आणि त्यांना ईद व नवरोजच्या शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान नरेन्द्र मोदींनी ही माहिती सोशल मीडियावर दिली. पंतप्रधानांनी लिहिले की मी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पाझाश्कियान यांच्याशी बोललो. ▶▶ पान २ वर

# एलपीजी वाटप २० टक्क्याने वाढविण्यास केंद्राची मंजूरी

**दिल्ली । वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने शनिवारी (२१ मार्च, २०२६) राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीच्या वाटपात आणखी २०% वाढ करण्यास परवानगी दिली आहे. यामुळे आता व्यावसायिक एलपीजीचे एकूण वाटप ५०% होईल, ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.१७ मार्च २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३४३.५० क्विंटल | २,१२५ | २,५७० | २,२४६ |
| ज्वारी/हायब्रिड: २४६.५० क्विंटल | १,६०० | ४,६०० | ३,२० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ११.०० क्विंटल | ७,००० | ७,२०० | ७,१३३ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: १४.०० क्विंटल | २,५०० | ३,०६९ | २,७८८ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभरा: २७.०० क्विंटल | ४,८५० | ५,१०० | ४,९३१ |

# कुपोषण निर्मूलनात लातूर जिल्हा मराठवाड्यात पहिला

**लातूर । प्रतिनिधी**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत लातूर जिल्हा परिषदेने आपला ठसा उमटविला असून राज्य शासनाने निश्चित केलेल्या दहा मुख्य कार्यक्षमता निर्देशांकांच्या आधारे करण्यात आलेल्या मूल्यांकनात लातूर जिल्हा परिषदेने राज्यात तिसरा, तर मराठवाड्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.**

शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांचे पोषण ट्रॅकर ॲप्लिकेशनमधील माहितीच्या आधारे रँकिंग करण्यात आले. त्यात पूरक पोषण आहार वितरण, बालकांचे अचूक वजन मापन, कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, अंगणवाडी सेविकांच्या गृहभेटी, गर्भवती व स्तनदा मातांचे लसीकरण व समुपदेशनाची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये लातूर जिल्हा परिषदेने राज्यात तृतीय क्रमांक मिळविला आहे. जिल्हा परिषदेचे सीईओ राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले. जिल्ह्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका आणि अंगणवाडी सेविकांनी 'पोषण ट्रॅकर'वर माहिती भरण्यापासून ते प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत सेवा पोहोचविण्यापर्यंत चोख कामगिरी बजावली. या उपक्रमात राज्यात वाशिमने प्रथम, भंडारा जिल्ह्याने द्वितीय तर लातूरने तृतीय क्रमांक मिळविला आहे. आगामी काळात आणखीन विशेष उपक्रमांतून कुपोषण निर्मूलन, बालकांचा सर्वांगिण ▶▶ पान २ वर




cmyk

अग्रलेख

# बळीराजासाठी संकटपूर्व नियोजनाची गरज...

निसर्गाचे बदलते चक्र किंवा लहरी हवामानाचा मुद्दा अलीकडच्या काही वर्षांत ऐरणीवर आला आहे. मागच्या पाच ते सहा दिवसांपासून महाराष्ट्राच्या काही भागांत होणारा अवकाळी पाऊस व गारपीट, हा त्याचाच नमुना म्हणावा लागेल. नेमेची येतो पावसाळा, असे म्हणतात. त्याला जोडूनच आता 'नेमेची येतो अवकाळी पाऊस' असे म्हणण्यासारखी स्थिती निर्माण व्हावी, यातच सगळे आले. अनेक जिल्ह्यांमध्ये रब्बीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. परंतु, अवकाळी व गारपीटीने या पिकावर सध्या गंडांतर आलेले पहायला मिळत आहे.

यंदाच्या गारपिटीचा ११ जिल्ह्यांना फटका बसल्याचे सांगण्यात येते. यामध्ये अहिल्यानगर, नागपूर, चंद्रपूर, लातूर, नांदेड, धाराशिव, यवतमाळ, सोलापूर, पुणे, सातारा, कोल्हापूर यांसारख्या जिल्ह्यांचा समावेश आहे. गहू आणि हरभरा या पिकांची बहुतेक ठिकाणी काढणीची कामे सुरू असताना पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावून घेतला आहे. कांदा, मका, ज्वारी, आंबा, केळी, कलिंगड, खरबूज, ऊस, पपई, द्राक्षे, डाळिंब, लिंबू, मोसंबी, संत्रे तसेच भाजीपाला पीकाची यामध्ये मोठी वाताहत झाल्याचे आकडेवारीतून ध्यानात येते. यात सर्वाधिक नुकसान अहिल्यानगर जिल्ह्यात झाले आहे. या जिल्ह्यातील ३ हजार ५५८ हेक्टर पिकांना फटका बसला आहे. आत्तापर्यंत एकूण ३० तालुक्यांतील ६ हजार ९१३ हेक्टरवरील पिके जमीनदोस्त झाली आहेत. अवकाळीचा तडाखा सुरूच असल्याने हा आकडा आणखी वाढू शकतो. हवामानातील चढ-उतार आपल्याला नवे नाहीत. परंतु, त्याची वाढती तीव्रता निश्चितच शेतकऱ्यांसाठी चिंताजनक ठरते. गारपीट पूर्वीही व्हायची. पण, त्याचे प्रमाण इतके नव्हते. त्यामुळे गारांचा हा पाऊस आल्हाददायक वाटायचा आणि त्याच्याकडे आनंदाचे प्रतीक म्हणूनही पाहिले जायचे. आता गारपीट म्हणजे संकट म्हणूनच ओळखले जाते. याला कारण गारपीटीचे सातत्याने दिसणारे उपद्रवमूल्य होय. मध्य प्रदेश, पूर्व उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, आसाम व अऊणाचल प्रदेशवर हवेची द्रोणीय स्थिती, मध्य प्रदेश-विदर्भ-मराठवाडा तसेच उत्तर कर्नाटकदरम्यान असलेला हवेचा दाब यामुळे देशाच्या अनेक भागात अवकाळी पावसासह गारपीट होत आहे. महाराष्ट्राशिवाय हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक राज्यातदेखील अनेक भागात गारपीट झाल्याचे वृत्त आहे. याशिवाय उत्तरेतील काही राज्यांना गारपिटीचा इशाराही देण्यात आला आहे. हे बघता गारपीटीचा धोका कमी अधिक प्रमाणात देशातील बहुतांश राज्यांना भेडसावताना दिसतो. त्यामुळे या संकटाचा सामना कसा करायचा, त्यातून मार्ग कसा काढायचा, पिकांचे संरक्षण कसे करायचे, याचा दीर्घकालीन विचार करणे क्रमप्राप्त ठरते. वास्तविक सध्याचे दिवस कडक उन्हाळ्याचे आहेत. वाड्यावस्त्यांपासून शहरातील सोसायट्यांपर्यंत सर्वत्र पाणीटंचाईची झळ बसताना दिसत आहे. त्यात कडक उन्हाळ्यानेही हैराण करून सोडले आहे. अशा काळात गारपीट व अवकाळी पाऊस हा दिलासा वाटावा. पण तात्पुरताच. कारण बदलत्या चक्रामुळे निसर्गाची म्हणून जी साखळी असते, त्यात अनेक अडथळे निर्माण होतात. सध्या अशीच परिस्थिती आहे.

तसा मागच्या वर्षी देशभर सर्वत्र दमदार पाऊस झाला. थंडीची तीव्रताही अधिक असल्याचे दिसून आले. त्यानंतर गारपीट व अवकाळीसारखी संकटेही तितकीच तीव्र असल्याचे पहायला मिळत आहे. गतवर्षी मेमध्येच पाऊस सुरू झाला होता, या वर्षी काय होते, हे पहावे लागेल. दुसऱ्या बाजूला प्रशांत महासागरातील ला निनो या थंड पाण्याचा प्रवाहाचा परिणाम आता कमी होत आहे. त्यामुळे जुलैनंतर एल निनो वाढीस लागण्याचा अंदाज जागतिक हवामान संस्थेने वर्तविला आहे. परिणामी मान्सूनच्या दुसऱ्या टप्प्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. २०२३-२०२४ साली प्रशांत महासागरात एल निनो उद्भवला होता. यामुळे २०२४ साल हे तापदायक वर्षांमध्ये गणले गेले होते. एल निनोमुळे भारतीय मान्सूनवर परिणाम होऊन तो कमी बरसल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे यंदा एल निनोचा अंदाज वर्तविल्यानंतर भीतीचे सावट पसरल्याचे दिसून येते. गेल्या वषी प्रशांत महासागरात ला निनोची स्थिती होती. ला निनो अर्थात प्रशांत महासागरात निर्माण होणाऱ्या थंड पाण्याच्या प्रवाहांमुळे भारतीय मान्सूनवर विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे २०२५ साली पावसाचे भरभरून दान मिळाले. सध्या ला निनोचा कालावधी संपत आला असून, एप्रिलपर्यंत प्रशांत महासागरात तटस्थ स्थिती निर्माण होणार आहे. एल निनोची स्थिती भारतीय भूभागावर येणारे बाष्पयुक्त वारे खेचून घेत असल्याने पाऊस कमी बरसतो. याशिवाय यामुळे प्रशांत महासागराच्या समुद्रसपाटीचे तापमान वाढते. तसेच वाऱ्यांचा वेग, पॅटर्न, दाब, पावसाची स्थिती बदलते. मार्च ते मेच्या कालावधीत प्रशांत महासागरातील एन्सोची स्थिती तटस्थ (म्हणजेच ना एल निनो किंवा ना ला निनो राहणार) अशी राहण्याची शक्यता ६०, तर एप्रिल ते जूनच्या कालावधीत ती ७० टक्के राहण्याचा अंदाज आहे. तसेच जुलैनंतर एल निनो उद्भवण्याची शक्यता ही ४० टक्के इतकी आहे.

एकूणच जुलैनंतर तो वाढीस लागणार आहे. म्हणजे वर्षाच्या दुसऱ्या तसेच मान्सून दुसऱ्या टप्प्यापासून तो अधिक कार्यशील राहणार असल्याची चिन्हे आहेत. मान्सूनचा दुसरा टप्पा अर्थात ऑगस्ट आणि सप्टेंबर या कालावधीत सर्वाधिक व सरासरीच्या अधिक पाऊस बरसत असतो. त्यामुळे या कालावधीतील पाऊस हा शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याकरिताही महत्त्वाचा मानला जातो. पण, एल निनोचा फटका मान्सूनला बसला, तर अवर्षणाची वा दुष्काळाची स्थिती निर्माण होऊ शकते. ही धोक्याची घंटाच ठरावी. भारतीय शेती तसेच अर्थव्यवस्था पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून आहे. आधीच जागतिक युद्ध, इंधन, गॅसची टंचाई, वाढती महागाई यामुळे सामान्य माणूस मेटाकुटीस आला आहे. अशा स्थितीत एल निनोच्या संभाव्य संकटामुळे काळजाचा ठोका चुकला नाही, तर नवलच. देशात पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा हे ऋतू आहेत. या तीन ऋतूंमध्ये असमतोल निर्माण झाला, की संकट येते. हे घोंघावणारे वारे पाहता आपल्याला संटकपूर्व नियोजन करावेच लागेल.

# ईदनिमित्त आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांनी मुस्लिम समाजाला मिळाली भेट

## अल्पसंख्याक मुलींसाठी लवकरच सुसज्ज वसतिगृह उभारणार, जागेचा प्रश्न मार्गी लागला

**बीड । प्रतिनिधी**

**रमजान ईदच्या पर्वावर मुस्लिम समाजाला आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमुळे मोठी भेट मिळाली आहे. बीड शहरात लवकरच अल्पसंख्याक मुलींसाठी स्वतंत्र, सुसज्ज वसतीगृह उभारले जाणार आहे. या वस्तीगृहाच्या कामासाठी आ शासनस्तरावरून मंजुरी अगोदरच मिळालेली आहे. परंतु जागा उपलब्धततेच्या प्रश्नामुळे काम सुरू होण्यास अडचण येत होती. परंतु आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यामुळे ती अडचणही दूर झाली आहे. शहरातील किल्ला मैदान येथे असलेल्या डाक बंगल्याची जागा आता वसतीगृहासाठी उपलब्ध झाली असून लवकरच प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत राज्याच्या उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक मंत्री तसेच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार मानले आहेत.**



अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी बीड शहरात एक सुसज्ज वसतीगृह असावे, जेणेकरून बीड मतदासंघातील आणि जिल्ह्यातील विद्यार्थीनिंना याचा फायदा होईल. यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यातून बीड शहरात अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधकामास शासनाकडून निधीसह मंजूरी मिळाली होती. परंतु यासाठी योग्य जागा उपलब्ध असण्याची गरज होती. याबाबतही आ.क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला. परिणामी बीड शहरातील किल्ला मैदान परिसरातील नगर परिषदेच्या बंद आणि निकामी असलेल्या किल्ला मैदानाची जागा ही वसतीगृहासाठी योग्य असल्याने ती उपलब्ध करण्याबाबत प्रक्रिया करण्यात आली. आणि आता शासनाच्या नियमानुसार ही जागा नगर विकास विभागाच्या अखत्यारीत असल्याने प्रथमतः महसूल व वनविभागाला प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रशासनाने प्रत्यार्पणाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. लवकरच ही सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन जागा उपलब्ध झाल्यावर लवकरच वस्तीगृहाच्या बांधकामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येणार आहे. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी अल्पसंख्याक विभागासह शासनाचे आभार मानले आहेत. दरम्यान आ.क्षीरसागर हे या संदर्भात सातत्याने प्रयत्नशील आहेत. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही त्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता.

# ज्ञानसागर गुरुकुलचे सामाजिक विषयावरील देखावे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले

बीड । प्रतिनिधी

हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या मंगलमय पर्वा निमित्त यंदा शक्ती, संस्कृती आणि परंपरेचा अप्रतिम स्वागत यात्रा जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संप्रदाय बीड जिल्हा स्थापित रामानंद संप्रदायाच्या वतीने दि. १९ मार्च २०२६ गुरुवार रोजी भव्यदिव्य शिस्तबद्ध ,पालखी व शोभायात्रा बालाजी मंदिर पासून सुभाष रोड साठे चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे बार्शी रोडवरील आशीर्वाद लॉन्स पर्यंत निघालेल्या या शोभायात्रेमध्ये ज्ञानसागर निवासी गुरुकुल नगर रोड बीड येथील विद्यार्थ्यांने सहभाग घेऊन अनेकांचे मने जिंकले, गुढीपाडवा नवीन वर्षानिमित्त मराठी महिन्यातील पहिला दिवस म्हणजे प्रभू रामचंद्र वनवासातून आयोध्यात परतले, गुढीपाडवा म्हणजे हिंदू विजय दिन, या दिवशी एक नवीन ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने भव्य दिव्य शोभायात्रेत जगद्गुरु रामानंदचार्याजी यांच्या तैलचित्राचे भारावून टाकलेले व सजवलेला आकर्षक रथ त्यावरील देखणी सजावट आणि गोजीरी मूर्तीने भाविक भक्तांचे लक्ष वेधून घेतले,उंट, घोडे, रथ, कुल्र्याचे हलगी पथक, ढोल ,ताशे,झांज पथक, रगडे मामाचे हलगी,

संबळ, बंजारा पथक, भजनी मंडळी, निशानधारी महिला, कळसदारी महिला,वेगवेगळ्या वेशभूषांमध्ये राम पंचायतचे राम-लक्ष्मण सीता वेशभूषा देखील सर्वांचे आकर्षक ठरली, भाविक भक्त ,शिष्य, साधक, विविध लोकनृत्य, महिला बंजारा लोकनृत्याने धमाल केली, देखावे, देहदान देखावा, ग्रामपंचायत छत्रपती शिवाजी महाराज मावळे, हनुमान वानर सेना, विविध क्रांतिकारक, शूरवीर, साधुसंत इत्यादी देखावे ज्ञानसागर निवासी गुरुकुल नगर रोड बीड, श्री गणेश सानप सर व डॉ. संजय तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, या शोभायात्रेने संपूर्ण शहराला अध्यात्मिक ऊर्जेने भारावून टाकले हजारो भावीक भक्त साधक आणि चाहत्यांनी सहभाग नोंदवत नववर्षाचे स्वागत भक्ती भावाने करत हरिनाम आणि जय सियारामाच्या घोषणाने परिसर अक्षरशः दणाणून गेला होता. शेवटी महाप्रसादाचे वाटप करून शोभायात्रा बार्शी रोडवरील आशीर्वाद लॉन्स येथे संपन्न झाली.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी डॉ. ज्योतीताई मेटे यांची निवड करावी-प्रा.पंडित शेंडगे

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यातील महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'राज्य महिला आयोगाच्या' अध्यक्षपदासाठी डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांची निवड करण्यात यावी,अशी मागणी शिवसंग्रामचे सोशल मीडिया जिल्हा प्रमुख प्रा.पंडित शेंडगे यांनी केली आहे.**

प्रशासकीय अनुभवाची शिदोरी, राजकीय प्रगल्भता आणि सामाजिक प्रश्नांची असलेली जाण यांमुळे डॉ.ज्योतीताई या पदासाठी सर्वात 'योग्य' आणि 'सक्षम' उमेदवार असल्याचे मत राजकीय व सामाजिक वर्तुळातून व्यक्त होत आहे. प्रशासकीय अनुभव आणि पारदर्शक चारित्र्य, डॉ.ज्योतीताई मेटे यांच्याकडे प्रशासकीय सेवेचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे सरकारी कामकाजातील नियमांची अचूक जाण आणि कामाचा वेग ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. सार्वजनिक जीवनात वावरताना त्यांनी जपलेली चारित्र्याची शुद्धता आणि पारदर्शक कार्यपद्धती यामुळे त्यांच्या नावाचा विचार गांभीर्याने केला जावा असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे. स्व.विनायकराव मेटे साहेबांच्या निधनानंतर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगराखाली न दबून जाता, त्यांनी 'शिवसंग्राम' संघटनेची धुरा अत्यंत धैर्याने सांभाळली. एक 'संघर्षशील सखी' म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे.पीडित महिलांच्या हक्कासाठी लढण्याची जिद्द आणि



त्यांच्या प्रती असलेली संवेदनशीलता ही डॉ. ज्योतीताईंच्या व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये आहेत. राज्य महिला आयोगाला अशा नेतृत्वाची गरज आहे, ज्यांच्याकडे कायद्याची जाण आणि पीडितांबद्दल माणुसकी असेल.डॉ.ज्योतीताईंकडे या दोन्ही गोष्टींचा संगम पाहायला मिळतो. लोकसंग्रह आणि लोककल्याण या सूत्रावर आधारित त्यांची आजवरची वाटचाल राहिली आहे. ''प्रशासकीय अनुभव, राजकीय प्रगल्भता आणि सामाजिक संवेदना पाहता, डॉ.ज्योतीताई मेटे यांची निवड ही राज्यातील महिलांना न्याय देण्याच्या दृष्टीने अत्यंत 'न्याय्य' ठरेल,'' असा विश्वास शिवसंग्राम समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

## पान १ वरून...

### खरातने मराठवाड्याचे

शिवनिका संस्थानासाठी पाण्याची मोठी गरज होती. तेथे त्याने बाग, बगिचा लावला होता. यासाठी त्याने राजकीय वजन वापरून दारणा धरणातून थेट संस्थानपर्यंत तब्बल ४८ किलोमीटर लांबीची पाइपलाइन टाकण्याचा प्रस्ताव सादर केला होता. हा प्रस्ताव स्थानिक पाटबंधारे कार्यालयामार्फत गोदावरी महामंडळाकडे पाठविण्यात आला. महामंडळाच्या तत्कालीन कार्यकारी संचालकांनी ५ जानेवारी २०२० रोजी या प्रस्तावाला मंजुरी देत शासनाकडे पाठवले. त्यानंतर दारणा धरणातील पाणी गोदावरी उजव्या तट कालव्यातून बिगर सिंचन वापरासाठी खरात याच्या संस्थेला देण्यास मंजुरी देण्यात आली. मंत्रिमंडळ उपसमितीने ३१ जुलै २०२० रोजी या प्रस्तावाला अंतिम मान्यता देत ३९ लाख लिटर पाणी पुरवठ्याचा निर्णय घेतला. यासंदर्भातील शासन निर्णयही त्याच दिवशी जारी करण्यात आला. सूत्रांच्या माहितीनुसार, कॅप्टन खरात याने राजकीय प्रभावाचा वापर करून हे पाणी मंजूर करून घेतल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जायकवाडी प्रकल्पातून छत्रपती संभाजीनगरसह अनेक भागांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, कमी पावसामुळे प्रकल्प वारंवार अपुरा पडतो आणि नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागतो. प्रति व्यक्ती दररोज ५५ लिटर पाण्याची गरज लक्षात घेतली, तर भोंदू बाबाला देण्यात आलेल्या ३९ लाख लिटर पाण्यातून सुमारे ७१ ते ७२ हजार नागरिकांची तहान भागू शकली असती, असे अभ्यासक सांगतात.

-------------

### पीक नुकसानीचे तातडीने

अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळावी यासाठी तत्काळ सर्वेक्षण करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असल्याचे कृषिमंत्री चौहान यांनी म्हटले आहे. किमान आधारभूत किमतीत खरेदी सुरळीतपणे करण्यासाठीही आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू शकेल. ज्या भागांमध्ये जोरदार पाऊस, गारपीट अथवा इतर कोणत्याही प्रतिकूल हवामानामुळे शेतपिकांचे नुकसान झाले आहे, तिथे क्षेत्रीय स्तरावर वेळेवर कार्यवाही करावी, जेणेकरून कोणत्याही शेतकऱ्याला भरपाई मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. मंत्री चौहान यांनी सर्व अधिकाऱ्यांना राज्यांशी तत्काळ संपर्क साधण्याचेही निर्देश दिले आहेत. जेणेकरून पीक कापणी प्रयोग योग्य पद्धतीने होतील आणि नुकसानीचे अचूक मूल्यांकन करता येईल. तसेच शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्यास विमा दावे योग्य पद्धतीने निकाली काढता येतील. तसेच पिकांची स्थिती, हवामानाशी संबंधित जोखीम, खरेदीची तयारी आणि मदत यंत्रणा यांच्यात अधिक चांगला समन्वय असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

-------------

### दै.राज्य लोकतंत्रचा ५ वा

चव्हाण, दत्ता देशमुख, आत्माराम वाव्हळ, शिवप्रसाद सिरसाठ, लक्ष्मण नरनाळे, उदय पाटील, शंकर सुरवसे, उबाळे, सजय हंगे, शेख रिजवान, प्रचंड सोळुंके, नितीन चव्हाण, संपादक शिवाजीराव रांजवन, बालाजी मारगुडे, वैभव स्वामी, चंदन पठाण, डॉ. लक्ष्मीकांत बाहेरगव्हाणकर, संपादक शेखर कुमार, दीपक सर्वज्ञ, संपादक दिपक थोरात, संपादक किशोर कागदे, अविनाश वाघीरकर, नारायण नाना नागरे, सुनील क्षीरसागर, भीमराव आखाडे, प्रदीप राठोड, दिनेश राठोड, भागवत तावरे, संग्राम धनवे, सय्यद कौसर, कयूम बागवान, रवींद्र पालीमकर, आनंद डोंगरे, हॉटेल ग्रँड यशोदा चे संचालक विशाल सुसकर, संदीप बेदरे, अर्जुन मुंडे, सय्यद सज्जाद, बंडू खांडेकर, गुलदाद पठाण, दत्ता आजबे, नंदकुमार गायकवाड, अंकुश चव्हाण, दादा आदमाने, नागेश क्षीरसागर, अमोल शिंदे, नितीन जाधव, नितीन साखरे, ॲड. हेमाताई पिंपळे, किशोर सोनवणे, आरती कोरडे, संजय गुरव, धनंजय जोगडे, लुचारे सर, सरपंच सुंदर चव्हाण, अप्पा महानोर, दत्ता प्रभाळे, नितीन कांबळे, दीपक ढेंगे काझी समीरोदिन, युवराज जगताप, दिनेश हंगे, डॉ.चंद्रकांत तोंडे, डॉ.माधव सानप, डॉ, अरुण भस्मे, डॉ.राजेंद्र सानप, डॉ.अशोक थोरात, डॉ. अमोल गीते, डॉ.संजय तांदळे, सीए बीबी जाधव, किस्किंदा पांचाळ, आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री येडे, एमआयएम चे जिल्हाध्यक्ष शेख शफिक भाऊ, नगरपालिकेचे सभापती शेख निजाम, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, माजी सभापती नवनाथ शिराळे, नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे, अनिल अष्टपुत्रे, ॲड. जाधव, ॲड. अविनाश गंडले, ॲड. तेजस नेहरकर, ॲड. किशोर खेडकर, ॲड. विक्रांत पारगावकर, भीमराव जाधव, प्रा. नितीन जायभाये, प्रा.नितीन आघाव, माऊली शिरसाट, केशव तांदळे, बबनराव ढाकणे, महादेव नागरगोजे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, ॲड. राख, प्राध्यापक लक्ष्मण गुंजाळ, समता परिषदेचे सुभाष राऊत, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर, सुभाष सानप, विजयकुमार जाधवर, नितीन राऊत, अविनाश नाईकवाडे, युवा शिवसेनेचे विपुल पिंगळे, नितीन धांडे, भागवत वैद्य, राजेंद्र आमटे, सागर गायकवाड, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे, रेल्वे आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, मंगेश लोळगे, ॲड. जोजारे, ॲड. बी, एम, जाधव, ॲड. भंडारे, ऊसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष बडे, शिवसंग्रामचे सुहास पाटील, सत्यप्रेम लगड, इन्फंट इंडियाचे दत्ताभाऊ बारगजे, सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे, सहारा अनाथलयाचे संतोष गर्जे, रामनाथ खोड, संजय मिसाळ, प्रशांत लव्हरीकर, गणेश शेवंतकर, केज बाजार समितीचे उपाध्यक्ष पिंटू ठोंबरे, दत्ता तांदळे, भागवत जाधव, कृष्णा मोकाशी, महादेव जायभाय, अशोक शेजुळ, भैय्या वाघमारे, भाई गोले पाटील, बाजीराव ढाकणे, संगमेश्वर आंधळकर, महिला आयोगाच्या सदस्या शिवसेनेच्या महिला आघाडी नेत्या संगीता चव्हाण, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे, बबन आंधळे, शिवसंग्रामचे गणेश मस्के,रमेश गंगाधरे, प्रा.जगन्नाथ मिसळे, ॲड.उदय तुपारे, ॲड. शेषेराव पाखरे, ॲड. प्रधान, प्रा.राजेंद्र तिडके, प्रा.आर आर कांबळे, प्राचार्य डी.जी .सारोक्ते, प्राचार्य आर. आर.तांदळे, प्रा.देविदास चव्हाण, प्रा.प्रदीप काळे, उद्योजक राहुल उजगरे, पत्रकार अर्जुन मुंडे, सुनिल सुरवसे , प्रतिक कांबळे, सचिन दुधाळ, यांनी यावेळी उपस्थित राहून दै.राज्य लोकतंत्रचे संपादक संचालक गणेश मोकाशे, कार्यकारी संपादक सुभाष चौरे, मुख्य उपसंपादक अनिल जाधव, उपसंपादक विशाल साळुंके, व्यवस्थापक दिलीप शिंगाडे आदिंना शुभेच्छा दिल्या.

-------------

### एलपीजी वाटप २० टक्क्याने

ज्यामध्ये पाईपद्वारे नैसर्गिक वायूच्या संक्रमणाला आणि विस्ताराला चालना देण्यासाठी पूर्वी जाहीर केलेल्या १०% वाटपाचा समावेश आहे. हे अतिरिक्त २०% हॉटेल, अन्न प्रक्रिया/दुग्धव्यवसाय, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या अनुदानित कॅन्टीन/आऊटलेट्स यांसारख्या क्षेत्रांना प्राधान्याने दिले जाईल, असे निवेदनात म्हटले आहे. सरकारने पुष्टी केली की, सध्या पश्चिम पर्शियन गल्फ प्रदेशात ६११ भारतीय खलाशांसह एकूण २२ भारतीय ध्वज असलेली जहाजे अडकली आहेत. आतापर्यंत ५३४ हून अधिक भारतीय खलाशांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यात आले आहे, ज्यात गेल्या २४ तासांत २१ जणांचा समावेश आहे, असे निवेदनात म्हटले आहे. वेगवेगळ्या घटनांमध्ये सहा भारतीय नागरिकांनी आपले प्राण गमावले असून एक जण अद्याप बेपत्ता आहे. दरम्यान, इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इशारा दिला आहे की, अमेरिका आणि इस्रायल येत्या आठवड्यात, रविवारपासून (२२ मार्च, २०२६) इराणवरील हल्ले तीव्र करतील. यापूर्वी, अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी (२१ मार्च, २०२६) इराणच्या नतान्झ अणुसुविधेवर हल्ला केला, असे इस्लामिक प्रजासत्ताकाच्या अणुऊर्जा संघटनेने सांगितले. संघटनेने पुढे म्हटले आहे की, मध्य इराणमधील या परिसरात ''किरणोत्सर्गी पदार्थांची कोणतीही गळती झाल्याचे वृत्त नाही.

-------------

### मध्य पूर्वेतील हल्ल्यांचा

या सणासुदीच्या काळात मध्य-पूर्वेत शांतता आणि स्थैर्य नांदेल अशी आशा आम्ही व्यक्त केली. इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी झालेल्या संभाषणात, मोदींनी मध्य-पूर्वेतील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवरील (जसे की तेल, वीज इत्यादी) हल्ल्यांचा निषेध केला, कारण याचा परिणाम प्रदेशातील शांततेवर आणि जागतिक पुरवठ्यावर होतो. ते म्हणाले की, सुरळीत व्यापारासाठी सागरी मार्ग खुले आणि सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे. इराणमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या संरक्षणासाठी केलेल्या मदतीबद्दल त्यांनी इराणचे आभारही मानले.

-------------

### रुपयाच्या घसरणीवरून राहुल

औद्योगिक इंधनाच्या किमतीत झपाट्याने वाढ होत आहे. हे केवळ आकडे नाहीत, तर येणाऱ्या महागाईचे स्पष्ट संकेत आहेत. सरकार याला सामान्य म्हणू शकते, परंतु वास्तव हे आहे की, उत्पादन आणि वाहतूक महाग होईल. एमएसएमई क्षेत्राला याचा मोठा फटका बसेल; दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढतील; परकीय गुंतवणूकदारांचा पैसा वेगाने बाहेर जाईल, ज्यामुळे शेअर बाजारावर अधिक दबाव येईल. थोडक्यात सांगायचे तर, याचा प्रत्येक कुटुंबाच्या खिशावर थेट आणि खोलवर परिणाम होणार आहे. निवडणुका संपल्यानंतर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमती वाढवणे ही केवळ काळाची बाब आहे. मोदी सरकारकडे कोणतीही दिशा किंवा रणनीती नाही. फक्त पोकळ भाषणबाजी आहे. सरकार काय म्हणतेय हा प्रश्न नाही, तर तुमच्या ताटात काय उरले आहे, हा खरा प्रश्न आहे, असेही राहुल गांधी म्हणाले. दरम्यान, राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनीही म्हटले की, इराणने अमेरिकेवर प्रत्युत्तर कारवाई केल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसेल. कारण आपण गॅस, एलपीजी आणि कच्च्या तेलासाठी त्या क्षेत्रावर अवलंबून आहोत आणि ही संसाधने पूर्ववत होण्यासाठी अनेक वर्षे लागतील. आपला व्यापार अमेरिकेवर अवलंबून आहे असा युक्तिवाद केला जातो, पण वस्तुस्थिती अशी आहे की ऊर्जेशिवाय कोणताही व्यापार किंवा उत्पादन होऊ शकत नाही. आपली ऊर्जा कोठून येते? ती मध्यपूर्वेतून हॉर्मुझ सामुद्रधुनीमार्गे येते. जर आपली ऊर्जा संसाधने संपुष्टात आली तर आपल्याकडे काय उरेल? मी सरकार आणि पंतप्रधानांना विनंती करतो की, ही गप्प बसण्याची वेळ नाही, असे ते म्हणाले.

-------------

### कुपोषण निर्मूलनात लातूर

विकास आणि सेवा वितरण अधिक बळकट करण्यावर भर राहणार आहे. भविष्यात जिल्हा कुपोषणमुक्त होईल असा विश्वास सीईओ राहुलकुमार मीना यांनी व्यक्त केला आहे. सीईओ राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली बालविकास प्रकल्प अधिकारी, अंगणवाडी ताईंनी केलेल्या सामूहिक प्रयत्नामुळे हे यश मिळाले आहे. समन्वयाने आणखीन गती वाढविण्याचा प्रयत्न राहणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख यांनी दिली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २२ मार्च २०२६


## संस्कार भारतीतर्फे नववर्ष स्वागताचा संगीत सोहळा उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**

**हिंदू नववर्ष शके १९४८ गुढीपाडवा निमित्त संस्कार भारती, माजलगाव यांच्या वतीने बहारदार संगीत कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १९ मार्च रोजी करण्यात आले होते. श्री. ढुंडीराज टेंबे गणेश मंदिर येथे आयोजित या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



कार्यक्रमात प्रमुख गायक संतोष बीडकर (लातूर) व सई बीडकर यांनी आपल्या सुरेल आवाजाने उपस्थितांची मनं जिंकली. त्यांना तबल्यावर मुकुंद मिरगे (बीड) तर संवादिनीवर कुणाल कुलकर्णी (माजलगाव) यांनी उत्तम साथ दिली. संगीतमय वातावरणात सादर झालेल्या विविध रचना आणि भावगीतांनी कार्यक्रम रंगतदार झाला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती प्रा.स्नेहल पाठक (प्रांताध्यक्ष, संस्कार भारती देवगिरी प्रांत), विपीन क्षीरसागर (जिल्हा कार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,अंबाजोगाई), जगदीश साखरे (मा.संघचालक, रा.स्व.संघ, माजलगाव), संजयजी जळवेकर (तालुका कार्यवाह, रा.स्व.संघ, माजलगाव), ॲड.विश्वास जोशी (कार्यवाह, श्री सिद्धेश्वर शै.संकुल, माजलगाव) तसेच मधुकरबुवा रामदासी (आचार्य, श्रीराम मंदिर, माजलगाव) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी नववर्षाच्या शुभेच्छा देत सांस्कृतिक परंपरा जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आयोजन संयोजन समितीने उत्तम प्रकारे केले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

## भोंदूबाबा खरात प्रकरणात रूपाली चाकणकरांना सहआरोपी करुन तात्काळ अटक करावी -वरेकर

बीड । प्रतिनिधी

नाशिक येथील कथित भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने महिलांची केलेली फसवणूक आणि अत्याचाराचे प्रकरण सध्या राज्याच्या राजकारणात चांगले च तापले आहे. महिलांवरील अत्याचाराचे ५८ व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणात आता शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात आली असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावर सह-आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्याची आणि तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.



शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे ही मागणी केली आहे.

गणेश वरेकर यांनी आपल्या पत्रात खळबळजनक आरोप करत खालील मागण्या मांडल्या आहेत:

सह-आरोपी म्हणून गुन्हा नोंदवा: भोंदूबाबा अशोक खरात याच्या कृत्यांना राजकीय पाठबळ असल्याचा संशय व्यक्त करत, या प्रकरणात रूपाली चाकणकर यांची भूमिका संशयास्पद असल्याने त्यांना सह-आरोपी करावे.

पक्षातून हकालपट्टी: राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वेसर्वा सुनेत्रा वहिनी पवार यांनी रूपाली चाकणकर यांचा तातडीने महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा घेऊन त्यांची पक्षातून हकालपट्टी करावी.

निष्पक्ष चौकशी: या प्रकरणात राजकीय नेते असण्याची शंका असल्याने निष्पक्ष चौकशी केली तर मोठे मोठे मासे गळ्याला लागतील त्या मुळे आरोपी मग तो सत्ताधारी पक्षातील असो वा विरोधक, कोणाचीही गय न करता कडक कारवाई व्हावी.

गणेश वरेकर यांनी बोलताना म्हटले आहे की, राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सातारा जिल्ह्यातील गाजलेले वडवणी तालुक्याची लेक मुलगी डॉ. संपदा मुंडे प्रकरण असो किंवा इतर महिला अत्याचार, या सर्व प्रकरणांत महिलांना न्याय देण्याऐवजी केवळ राजकीय हितसंबंध जोपासण्याचे काम झाले आहे. ‘‘महिला आयोगाच्या पदावर असतानाही अनेक गंभीर प्रकरणांत जातीने लक्ष दिले गेले नाही. उलट, काही प्रकरणांत आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न करुन महिलांच्या बाबतीत जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले. तर काही प्रकरणात महिलांना न्याय देण्या ऐवजी आरोपींना पाठिशी घालण्याचे पाप रुपाली चाकणकरांनी केले आहे.त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून पारदर्शक चौकशीचे आदेश द्यावेत,‘‘ असे वरेकर यांनी नमूद केले आहे. आता राज्य सरकार आणी पोलीस प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वारोळा येथे राहत्या घरात चालणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा

बीड । प्रतिनिधी

अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना दिनांक २०/०३/२०२६ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे माजलगाव ग्रामीण हद्दीत वारोळा गाव येथे बाहेर जिल्ह्यातून महिलांना बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. ही माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी परी. सहायक पोलीस अधीक्षक राहुलकुमार, प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे माजलगाव ग्रामीण व पोउपनि पल्लवी जाधव यांना टीमसह सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून पोस्टे माजलगांव ग्रामीण चे प्रभारी अधिकारी राहुलकुमार व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व दोन शासकीय पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या महिला एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी ५०० रुपयांची मागणी केली. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या महिलेला तिचे नाव गाव विचारले



असता, तिने तिचे अलका हडागाळे रा. वारोळा ता. माजलगांव जि बीड असे सांगितले. सदर महिलेची पंचासमक्ष झडती घेतली असता, डमी ग्राहकाने दिलेली नमूद वर्णनाची ५०० रू. दराची एक नोट मिळून आल्याने ती पंचासमक्ष जप्त केली. सदर ठिकाणी दोन पीडित महिला मिळून आल्या. त्यापैकी डमी ग्राहकासोबत रूम मधे मिळून आलेल्या पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता, तीने सांगितले की, ती परभणी ची असून, ची रामा गायकवाड रा. वारोळा ता. माजलगाव याने मला फोन करून इथे बोलवून घेतले आहे. तसेच दुसरी महिला छत्रपती संभाजीनगर येथून आली आहे. प्रत्येक ग्राहकाकडून ५०० रू घेतात व त्यापैकी आम्हाला ३०० रु देतात.

एजंट अलका हडागले व रामा गायकवाड दोघे रा. वारोळा ता माजलगांव जि बीड, हे पीडीत महिलांना बोलवून घेतात व वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. तसेच रुमची झडती घेतली असता १२ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. नमुद आरोपी हे पीडीत महिलांना, स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व त्याच कमाईवर स्वतःचा उदरनिर्वाह करत आहे व सदर महिलांचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, परी. सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुलकुमार प्रभारी अधिकारी माजलगांव ग्रामीण, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव, सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस हवालदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, संजय राठोड, पोलीस शिपाई आकाश कारले, विकास वाघमारे, विठ्ठल चव्हाण, सर्व नेमणूक व अ. मा. वा. प्र. कक्ष व पोठा माजलगांव ग्रामीण यांनी केली.

## आष्टी येथे श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा उत्साहात

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील भक्तिपरंपरेतील श्रद्धास्थान असलेल्या श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या आष्टी येथील मुर्शदपूर येथील मंदिरात शुक्रवारी प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन असल्याने सकाळपासून मंदिर परिसरात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यानिमित्ताने सकाळी श्री नां अभिषेक करण्यात आला त्यानंतर सामूहिक नामजप व साडेदहाच्या सुमारास नैवेद्य आरती यानंतर स्वामी चरित्र सारामृत, दुर्गा सप्तशती सामूहिक पाठ करण्यात आले.सायंकाळी सहा वाजून तीस मिनिटांनी महाआरतीचे आयोजन करण्यात



आले होते. ही महाआरती आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व सौ. रेखा कदम यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. भक्तांमध्ये आध्यात्मिक आनंदाचे वातावरण होते. त्यानंतर प्रकट दिनानिमित्त स्वामी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. कांतिलाल गव्हाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक सतीश वराट, युवा नेते महेश हंबर्डे, मुर्शदपूरच्या सरपंच शालिनी मुळे, नगरसेवक किशोर झरेकर, ग्रामपंचायत सदस्य कपिल अग्रवाल, मनोज धनवडे, आप्पा रेडेकर,जेष्ठ पत्रकार संतोष दाणी, सिताराम पोकळे, राजेंद्र लाड,शरद रेडेकर, सोपान पगारे,ॲड प्रविण आटोळे,अक्षय भोसले,अभय लाबडे,सचिन पवार,गणेश धुमाळ, राजु गोल्हार, बाबासाहेब कदम, दिलीप कदम,बबन कदम,सागर कदम,किरण कदम,दादा कदम,ओंकार कदम, वैभव पंडीत,श्रीनाथ मुरकुटे,करण बोडखे, प्रथमेश वाल्हेकर, गजानन दळवी, कृष्णा विधाते, हरिओम विधाते,संस्कार लाड,लोंढे साहेब, शिंदे सर,वाढरे सर यांच्यासह आदी उपस्थित होते. या सोहळ्याला महिला, पुरुष, वयोवृद्ध, युवक, बालगोपाल यासह श्री स्वामी समर्थ भक्तांची मोठी उपस्थिती होती. भक्तिभावाने साजरा झालेला हा सोहळा समस्त भक्तांसाठी पर्वणीच ठरला.

## दै.राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांची उपस्थिती














# पंतप्रधान कार्यालयाने कृषी मंत्रालयाकडून मागवली खत आणि रसायनांची माहिती

## केंद्र सरकारकडून उपाययोजना सुरु

दिल्ली / वृत्तसंस्था

देशातील खते आणि रसायनांची माहिती पंतप्रधान कार्यालयाने केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून मागवली आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून तणाव दीर्घकाळ राहण्याची शक्यता आहे. देशात खरीप हंगाम जूनपासून सुरु होतो. यापूर्वी खतांची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी सरकारने उपाययोजनांच्या दृष्टीने विचार सुरु केला आहे. तसेच मॉन्सून हंगामात एल-निनो सक्रीय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.


केंद्र सरकारच्या उपाययोजनांसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. कृषी मंत्रालयाने विविध कृषी संस्थांकडून उपाययोजना सुचवण्याची मागणी केली आहे. सध्या सरकारची प्राथमिक चिंता खरीप हंगामापूर्वी कोणताही तुटवडा निर्माण होऊ नये, ही आहे. मात्र, भविष्यात अशा संकटांना तोंड देण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचाही विचार सुरू आहे. खतांवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी उद्योगांकडून विविध शिफारशी करण्यात येत आहेत.



जैव-पोषण आणि जैवघटक तंत्रज्ञानामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून उत्पादन टिकवून ठेवता येत असल्याचा दावा केला जात आहे. तसेच भारतीय कृषी संशोधन परिषदेकडून हे तंत्रज्ञान प्रमाणित असून काही बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून त्याचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे ही उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबवता येऊ शकतात, असे उद्योगातील जाणकार सांगतात. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर उपाययोजना राबवून खतांचा तुटवडा भरून काढता येऊ शकतो. सध्या ७० ते ८० टक्के खत वाया जात असल्याने त्याचा कार्यक्षम वापर वाढवणे, उपलब्ध खतांचा अधिकाधिक उपयोग करणे आणि जैविक पर्यायांचा वापर वाढवणे यावरही भर देण्याची गरज असल्याचे उद्योगांचे मत आहे.

या तंत्रज्ञानामुळे नत्र, स्फुरद आणि पालाश यांसारख्या खतांचा वापर २५ टक्क्यांपर्यंत कमी करता येतो, तरीही उत्पादन कायम राहते. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होईल. तर सरकारच्या खतांवरील अनुदानाचा बोजाही कमी होईल, असा दावाही तज्ज्ञाकडून करण्यात येत आहेत.

# ‘असे’ करा शेळ्यांच्या आहाराचे व्यवस्थापन!



भारतात शेळीपालन हा एक प्रमुख कृषी जोडधंदा आहे. हा व्यवसाय प्रामुख्याने मांस उत्पादन आणि दूध उत्पादनांसाठी केला जातो. शेळीपालनात शेळ्यांच्या आहाराची विशेष काळजी घेणे गरजेचे असते, कारण यावरच त्यांच्या शरीराची वाढ आणि उत्पादन ठरलेले आहे. शेळ्यांच्या शरीराच्या सर्व गरजा चाऱ्यातील कोरड्या भागावर अवलंबून असतात. त्यानुसारच आहाराचे व्यवस्थापन करावे लागते.

वेगवेगळ्या चाऱ्याचे व्यवस्थापन : शेळ्यांना द्यायच्या आहारामध्ये हिरवा चारा, सुका चारा व खुराक असे चाऱ्याचे वर्गीकरण होते. यातूनच सर्व महत्त्वाची जीवनसत्वे दिली जातात. एकूण आहारामधील कोरडा भाग म्हणजे ड्राय मॅटर हा खूप महत्त्वाचा असतो. चाऱ्यामधील सर्व पाणी काढून घेतल्यानंतर राहिलेल्या भागाला कोरडा भाग असे म्हटले जाते. जीवनसत्वे ही कोरड्या भागात साठवलेली असतात. या कोरड्या भागाचे प्रमाण हे प्रत्येक प्रकारच्या चाऱ्यामध्ये वेगळे असते, जसे की, लुसलुशीत हिरव्या चाऱ्यामध्ये ८० ते ९०% पाणी असते त्यात कोरडा भाग १० ते २०% असतो. तर सुक्या चाऱ्यामध्ये फक्त १०% पाणी असते व कोरडा भाग जवळपास ९०% असतो. शरीराच्या सर्व गरजा या चाऱ्यातील कोरड्या भागावर अवलंबून असतात. त्यानुसारच आहाराचे व्यवस्थापन करावे लागते. शेळ्यांना विविध प्रकारचा झाडपाला आवडतो. झाडांची कोवळी पाने, कोवळ्या फांद्या व शेंगा त्या आवडीने खातात. त्यामुळे त्यांना नियमितपणे हा चारा मिळेल याची सोय करावी.

शेळीला तिच्या वजनाच्या ३ ते ४ टक्के शुष्क पदार्थ खाद्यातून मिळणे आवश्यक असते. या दृष्टीने एका प्रौढ शेळीला दररोज साधारण ३ ते ४ किलो हिरवा चारा, ७५० ग्रॅम ते १ किलो वाळलेला चारा व प्रथिनांच्या पूर्ततेसाठी २०० ते २५० ग्रॅम संतुलित आहार प्रतिदिन द्यावा. १५ किलो वजनाच्या पुढे १०० ग्रॅम कडबा कुट्टी किंवा वाळलेला चारा द्यावा व तो पुढे प्रति ५ किलो वजनास ५० ग्रॅम याप्रमाणे वाढवत जावे. उदाहरणार्थ २० किलो वजनाच्या शेळीला १५० ग्रॅम.

दूध देणाऱ्या शेळ्यांसाठी उपयुक्त खाद्याचे प्रमाण : मका ३७%, शेंगदाणा पेंड २४%, गव्हाचा कोंडा २०%, खनिज मिश्रण १%, चुना २.५%, मीठ ०.५%, हरभरा १५%. या संतुलित आहारामध्ये १८% प्रथिने आणि ७५% एकूण पचनीय घटक असतात.पैदाशीचे बोकड आणि शेळ्यांसाठी संतुलित आहार प्रमाण : गव्हाचा किंवा तांदळाचा भुसा ४५%, शेंगदाण्याची पेंड २०%, मका किंवा ज्वारी १२%, साखरेची मळी १०%, डाळीचा भरडा १०%,मीठ १%, चुना १%. या संतुलित आहारामध्ये १५% प्रथिने आणि ६५ ते ७०% एकूण पचनीय घटक असतात. अशाप्रकारे शेळया आणि बोकडासाठी आहाराचे व्यवस्थापन केल्यास त्यांची निश्चितच चांगली वाढ होईल.

# गुलाबी लसूण : जाणून घ्या लागवडीविषयी महत्त्वाच्या बाबी

अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत.

हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवितात, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही. मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते. बीड जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात गुलाबी दिसणार्या गावरान लसणाची लागवड केली जाते.

हवामान : या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गढ्ढ्यांची चांगली वाढ होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते. जमीन : मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात.

सुधारित जाती : महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे. आंतरपीक : लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.



# जिरेनियम ऑईल : सुगंधी शेतीचा सुवर्ण मार्ग

जिरेनियम ही एक सुगंधी वनस्पती आहे जी तिच्या सौम्य, गुलाबासारख्या सुगंधासाठी प्रसिद्ध आहे. ही वनस्पती मूळची दक्षिण आफ्रिकेतून आली असली तरी आता भारतासह जगभरात तिची लागवड केली जाते. महाराष्ट्रात, विशेषतः सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक आणि पुणे या जिल्ह्यांमध्ये जिरेनियमच्या शेतीला चालना मिळत आहे. जिरेनियमच्या पानांपासून आणि देठांपासून आवश्यक तेल काढले जाते, जे सौंदर्यप्रसाधने, अत्तर, साबण, मेणबत्त्या आणि औषधी उत्पादनांमध्ये वापरले जाते. या पिकाची लागवड सेंद्रिय खतांवर अवलंबून असते आणि रासायनिक खतांची गरज फारच कमी असते. जिरेनियमची लागवड वर्षभर करता येते आणि एकदा लागवड केल्यानंतर साधारण तीन वर्षे उत्पादन मिळते. हे पीक कमी पाण्यावर आणि कोणत्याही प्रकारच्या जमिनीत वाढू शकते, ज्यामुळे ते पडीक जमिनीवरही फायदेशीर ठरते. याशिवाय, जनावरांपासून या पिकाला धोका नसतो, कारण जनावरे जिरेनियम खात नाहीत.

जमीन आणि हवामान : जिरेनियमची लागवड कोणत्याही प्रकारच्या जमिनीत करता येते, परंतु चांगल्या निचऱ्याची, मध्यम काळी किंवा वालुकामय चिकणमाती जमीन सर्वोत्तम मानली जाते. जमिनीचा ६ ते ७.५ दरम्यान असावा.



महाराष्ट्रातील उष्ण आणि समशीतोष्ण हवामान जिरेनियमच्या वाढीसाठी अनुकूल आहे. या पिकाला २० ते ३० अंश सेल्सियस तापमान योग्य असते, तर पावसाळ्यात बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी पाण्याचा निचरा चांगला असावा. लागवडीपूर्वी जमीन नांगरून, ५ ते ६ ट्रॉली शेणखत किंवा कंपोस्ट खत प्रति एकर टाकावे. जिरेनियमची लागवड रोपांद्वारे केली जाते, आणि एका एकरसाठी साधारण ८,००० ते १०,००० रोपांची आवश्यकता असते. रोपे ६० सेमी ६० सेमी अंतरावर लावावीत, जेणेकरून वनस्पतीला पुरेशी जागा आणि सूर्यप्रकाश मिळेल.

जमीन तयारी : एक खोल नांगरून चांगली भुसभुशीत जमीन करावी. शेणखत (१०-१५ टन/हे.) घालून जमीन समृद्ध करावी. ओळींतून लागवड करण्यासाठी ६० ४५ से.मी. अंतर ठेवावे.

लागवड : जेरॅनियमची लागवड बीयांपासून न करता काट्यांपासून केली जाते. एक हेक्टरसाठी ३५,००० ते ४०,००० रोपे लागतात. काटे लावणीनंतर १-२ आठवड्यात रोपे सक्रिय होतात.

खत व्यवस्थापन : शेणखत, कंपोस्ट, वर्मी कंपोस्टचा वापर करा. नायट्रोजन फॉस्फरस पोटॅश वापर शक्यतो सेंद्रिय पद्धतीने करावा. जिवाणू खते वापरणे फायदेशीर.

पाणी व्यवस्थापन : लागवडीनंतर ७-१० दिवस नियमित हलके पाणी द्यावे. नंतर जमिनीनुसार १०-१५ दिवसांनी पाणी. ठिबक सिंचन वापरल्यास उत्पन्नात वाढ.

कीड व रोग नियंत्रण : मुख्यतः पानांवरील बुरशी, झाडे वाळणे असे रोग दिसतात. दशपर्णी अर्क, गोमूत्र अर्क, नीम अर्क यांची फवारणी.

जिरेनियमची कापणी आणि उत्पादन : जिरेनियमची पहिली कापणी लागवडीनंतर ४ ते ५ महिन्यांनी करता येते. त्यानंतर वर्षातून तीन वेळा कापणी करता येते. कापणी सकाळी किंवा संध्याकाळी करावी, जेव्हा पानांमधील तेलाचे प्रमाण जास्त असते. कापणीनंतर पाने आणि देठ त्वरित प्रक्रिया केंद्रात पाठवावेत, जेणेकरून तेलाची गुणवत्ता टिकून राहील. एका एकरातून साधारण २० ते २५ किलो तेल मिळते, आणि प्रति किलो तेलाची किंमत ८,००० ते १२,००० रुपये असते. यामुळे एका एकरातून १.५ ते ३ लाख रुपये उत्पन्न मिळू शकते. कापणीनंतर उरलेल्या पालापाचोळ्यापासून सेंद्रिय खत तयार करता येते, जे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न देऊ शकते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक जलजीवन दिवस

### महत्वाच्या घटना

१७३९ : नादिरशहाने दिल्ली ताब्यात घेतली
१८८२ : घातक संक्रमक बिमारी ‘टीबी’ ची ओळख झाली.
१८८८ : इंग्लिश फुटबॉल लीग ची स्थापना झाली होती.
१८९० : भारतीय कलाबाज, जिम्नॅस्ट, बलून वादक, पॅराशूटिस्ट आणि देशभक्त रामचंद्र चटर्जी हे पैराशूट मधून उतरणारे पहिले व्यक्ती बनले.
१९२८ : महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सुरुवात झाली
१९३३ : डकाऊ छळछावणीची सुरूवात झाली.
१९४५ : अरब लीगची स्थापना
१९४७ : स्वातंत्र्य भारताचे शेवटील व्हायसरॉय लॉर्ड माउंटबेटन यांचे भारतात आगमन झाले.
१९४९ : जॉर्डन हा देश स्वतंत्र झाला
१९४९ : माध्यमिक शालांत परीक्षेची सुरुवात
१९५४ : अमेरिकेतील मिशीगन शहराच्या साउथफिल्ड भागात पहिला शॉपिंग मॉल उघडण्यात आला.
१९६९ : भारतीय पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड ची स्थापना करण्यात आली.
१९७० : हमीद दलवाई यांनी पुणे येथे मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली.
१९९९ : लता मंगेशकर व भीमसेन जोशी यांना ’पद्मविभूषण’

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९७ : विल्हेल्म (पहिला) जर्मन सम्राट (मृत्यू: ९ मार्च १८८८)
१८६८ : रॉबर्ट मिलिकेन, नोबेल पारितोषिक विजेता, इलेक्ट्रॉनचा शोध, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१८८२ : उर्दू वर्तमानपत्र ‘जमाना’ चे संस्थापक व समाजसुधारक मुंशी द्यानारायण निगम यांचा जन्मदिन.
१८८५ : भारतीय पुरातत्वशास्त्रज्ञ गुलाम यजदानी, यांचा जन्मदिन.
१८९४ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रभावी क्रांतिकारक सूर्यसेन यांचा जन्मदिन. सूर्यसेन यांनी चटगाव येथील शस्त्रास्त्र हल्ल्याचे नेतृत्व केले होते.
१९२४ : मधुसूदन कालेलकर नाटककार, कथाकार आणि पटकथाकार (मृत्यू: १७ डिसेंबर १९८५)
१९२४ : यूए.एस.ए. टुडे चे स्थापक अल नेउहार्थ यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१३)
१९३० : ख्रिश्चन प्रसारण नेटवर्क चे स्थापक पॅट रॉबर्टसन यांचा जन्म.
१९३१ : बर्टन रिश्टर, नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९३३ : इराण चे पहिले अध्यक्ष अबोलहसन बनीसद्र यांचा जन्म.
१९४२ : सर रिचर्ड स्टेफोर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली क्रिप्स मिशन भारतात आले होते.
२००० : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक विजेता भारतीय टेबल टेनिसपटू नैना जयस्वाल यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३२ : योहान वूल्फगाँग गटें जर्मन महाकवी, लेखक, कलाकार आणि राजकारणी. गटें यांनी कालिदासाच्या ’शाकुंतल’चे जर्मनमधे भाषांतर केले होते. (जन्म: २८ ऑगस्ट १७४९)
१९७१ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, साहित्यिक व मासिक संपादक हनुमान प्रसाद पोद्दार यांचे निधन.
१९७७ : भारतीय कम्युनिस्ट नेता तसेच, भारतीय स्वातंत्र्यसेनानी ए. के. गोपालन यांचे निधन.
१९८४ : प्रभाकर आत्माराम पाध्ये लेखक व पत्रकार (जन्म: १९०९)
२००४ : बॅरिस्टर व्ही. एम. तथा ’भाऊसाहेब’ तारकुंडे कायदेपंडित, स्वातंत्र्यसैनिक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयात सामाजिक समस्यांसाठी लढा देणारे झुंजार कायदेतज्ञ (जन्म: ३ जुलै १९०९)
२००७ भारतीय तत्वज्ञानी वक्ते यू. जी. कृष्णमूर्ती यांचे निधन.

# मिरची पिकातील पांढरी माशी नियंत्रण



प्रामुख्याने वातावरणातील सततच्या बदलामुळे मिरची पिकामध्ये पांढरी माशीचा प्रादुर्भाव बऱ्याच ठिकाणी आढळून येतो. विशेषतः हवेतील वाढलेली आर्द्रता आणि उष्णता या किडीच्या वाढीसाठी अत्यंत पोषक वातावरण तयार करत असते. जमिनीची कमी होत असलेली सुपीकता आणि यामुळे पिकांची घटलेली रोगप्रतिकारक शक्ती हे देखील या किडीच्या वाढीचे मुख्य कारण आहे. परिणामी, वेळीच नियंत्रण न केल्यास मिरचीच्या उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ओळख आणि प्रादुर्भावाची प्रमुख लक्षणे : सुरुवातीला, पिल्ले आणि प्रौढ माशी पानांच्या खालच्या बाजूने रस शोषण करतात, ज्यामुळे पाने पिवळी पडतात. त्यानंतर, या किडीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या चिकट द्रवामुळे पानांवर काळी बुरशी वाढायला लागते. तसेच, ही कीड ‘लीफ कर्ल’ (चुरडा-मुरडा) या व्हायरसचा प्रसार करण्याचे काम करते, जे पिकासाठी अत्यंत घातक आहे. अखेरीस, पानांच्या कडा खालच्या बाजूने वळतात आणि पिकाची वाढ पूर्णपणे खुंटलेली दिसून येते.

जैविक नियंत्रण : सुरुवातीला बिव्हेरिया बॅसियाना किंवा व्हर्टिसिलियम लेकॅनी ४ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सेंद्रिय उपाय : १०,००० निम तेलाची (१.५ प्रति लिटर) दर १० दिवसांच्या अंतराने नियमित फवारणी करणे फायदेशीर ठरते. रासायनिक नियंत्रण : प्रादुर्भाव जास्त असल्यास पेगासस (१ ग्रॅम) किंवा ॲक्टरा (०.४ ग्रॅम ) प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी. सापळ्यांचा वापर : बागेत एकरी १५ ते २० पिवळ्या रंगाचे चिकट सापळे लावल्यास प्रौढ माश्या सहज नियंत्रित होतात. मल्चिंग तंत्रज्ञान : लागवडीवेळी चंदेरी किंवा पिवळ्या रंगाचे प्लास्टिक मल्चिंग वापरल्यास पांढऱ्या माशीचे प्रमाण कमी राहते. नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

cmyk




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# अंबड पोलीस ठाणे हद्दीत गांजा विकणारे ४ आरोपी जालना पोलिसांनी पकडले

अंबड। प्रतिनिधी

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे इसमांची माहिती काढून त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती मिळाली की, काही इसम घनसावंगी कडुन अंबड कडे स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी मानवी आरोग्यास हानीकारक असलेला गांजा अवैधरित्या ताब्यात बाळगुन मोटार सायकलवर घेवुन येत आहे. त्यानुषंगाने घनसावंगी फाटा येथे सापळा रचुन गांजा ताब्यात बाळगणारे आरोपी नामे १) सुरज गोविंद काळवंडे, वय-२२ वर्ष, रा. मच्छिंद्रनाथ चिंचोली, ता. घनसावगी जि. जालना २) सचिन



किसन नन्नवरे, वय-२१ वर्ष, रा. छत्रपती शिवाजीनगर, घनसावंगी, ता. घनसावंगी जि. जालना ३) संतोष सुंदर मुंढे, वय-२४ वर्ष, रा.माव पाटोदा, ता. परतूर जि. जालना ४) महेश देवराव चव्हाण, वय-२२वर्ष, रा. रा.छत्रपती शिवाजीनगर, घनसावंगी, ता. घनसावंगी जि. जालना यांना ताब्यात घेण्यात आले व त्यांच्या ताब्यातुन एकुण ०६ किलो वजनाचा गांजा किमंती १,२०,०००/- रुपयाचा माल व आरोपीने गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या दोन मोटार सायकल रु.१,२०,०००/-किमतीच्या असा एकुण रु.२,४०,०००/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीविरुध्द पोलीस ठाणे अंबड जालना येथे एन.डी.पी.एस. कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सिध्देश्वर धुमाळ अंबड उपविभाग, मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके, स्था.गु.शा.चे सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अंमलदार गोपाल गोशिक, सागर बाविस्कर, प्रशांत लोखंडे, देविदास भोजने यांच्यासह अंबड पोलीस ठाण्याचे अधिकारी पोउपनि. सि.व्ही.ठुबे व अंमलदार यशवंत मुंढे, संजय क्षीरसागर, अरुण मुंढे, तुकाराम मदन, अशोक मस्के, धनाजी गवळे, दिपक सोनवणे, विनोद भानुसे यांनी केली आहे.

# दिव्यांग व्यक्तीसाठी ऑफलाईन अर्ज बंद आता पोर्टलवर अर्ज करा-मिन्नु पी.एम

जालना। प्रतिनिधी


महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागामार्फत राज्यातील दिव्यांग व्यक्तींना सर्व कल्याणकारी सेवा आणि माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' हे स्वतंत्र डिजिटल व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे. या सिंगल विंडो सिस्टीममुळे आता दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ घेणे अधिक सोपे झाले असून, जालना जिल्ह्यातील सर्व संबंधित संस्था आणि व्यक्तींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी. एम. यांनी केले आहे.

या नवीन प्रणालीनुसार, जिल्ह्यातील दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांची नोंदणी किंवा नूतनीकरण, नागरी समाज संघटनांची प्रक्रिया आणि दिव्यांग विवाह योजनेसाठीचे अर्ज आता केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जाणार आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, या कामांसाठी



यापुढे कोणतेही ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज असा करा- इच्छुक संस्था आणि लाभार्थ्यांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपली अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि पारदर्शक कारभारासाठी हे पोर्टल अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. असेही कळविले आहे.

# अंबड येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिन उत्सव उत्साहात साजरा



अंबड। प्रतिनिधी

शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. प्रकट दिनानिमित्त १४ ते २० मार्च या कालावधीत विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाच्या निमित्ताने गेल्या ७ दिवसांपासून श्री गुरुचरित्र पारायण सोहळा सुरू होता, ज्यामध्ये १०० भाविकांनी सहभाग नोंदवला. तसेच दररोज नामजप आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने हनुमान चालीसा पठण व भजनाचे कार्यक्रमही पार पडले.

प्रकट दिनाच्या मुख्य दिवशी आज (ता.२०) शुक्रवारी पहाटे ६ ते ९ या वेळेत श्री गुरुचरित्र पारायण समाप्ती झाली. त्यानंतर सकाळी ९ ते १०:३० या वेळेत अंबड शहरातून स्वामींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. पालखी सोहळ्यानंतर १०:३० ते १२ या वेळेत ह.भ.प. दामोधर महाराज शिंदे यांचे सुश्राव्य प्रवचन झाले. दुपारी १२ वाजता महाआरती करून प्रकट दिन साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे भक्तीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत याप्रसंगी 'मोफत डोळे तपासणी' शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाचा आणि महाप्रसादाचा लाभ अंबड शहर व परिसरातील सुमारे दोन-अडीच हजार भाविकांनी घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष केदार मंत्री, सचिव कैलास राठी, उपाध्यक्ष दत्तात्रय वराडे, कोषाध्यक्ष इंद्रजित गिरामे, सदस्य डॉ.सतिश सारडा, सतिश सोमाणी, व्यवस्थापक पंढरीनाथ जाधव, पुजारी प्रसाद देशमुख तसेच कर्मचारी पुरुषोत्तम ढोले, प्रदिप जिगे, विठ्ठल माने यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्यासाठी प्रशांत खोमकर, हरणे साहेब, गणेश सातपुते, भगवान शेंडे, संदिप आंधळे, आर्दड आदींसह प्रभात फेरी सत्संग मंडळ आणि असंख्य स्वामी सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# गावातील माहिती पोलीस पाटलांनी तात्काळ पोलीस स्टेशनला द्यावी-वीरेंद्र मिश्र

जालना । प्रतिनिधी

जालना उपविभागातील नवनियुक्त पोलीस पाटील यांचेसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर आयोजित जालना येथे आयोजित करण्यात आले होते. जालना पोलीसांच्या वतीने जालना उपविभागातील नवनियुक्त पोलीस पाटील यांचेसाठी पोलीस पाटील यांचे दैनंदिन कामकाज कशा प्रकारे चालते तसेच गावातील महत्वाच्या घडामोडींची माहिती सबंधीत पोलीस स्टेशनला देण्याबाबत मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन मा.श्री. विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर त्यांच्या हस्ते करुन जालना पोलीस दलाच्या वतीने जालना जिल्हयातील पोलीस पाटील यांचेसाठी तयार करण्यात आलेल्या पोलीस पाटील मार्गदर्शीका



या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा.श्री. अजयकुमार बंसल पोलीस अधीक्षक, जालना, मा. श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक, उपविभागी पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे. श्री सिद्धेश्वर धुमाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच नवनियुक्त पोलीस पाटील यांना प्रशिक्षण शिबीराचे माध्यमातून पोलीस कायदा, पोलीस पाटील यांची जबाबदारी व कर्तव्य, सायबर गुन्हे, पोक्सो कायदा व जनजागृती या विषयावर सविस्तपणे तीन सत्रामध्ये श्री. नितीन कटेकर उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन, श्री. अनंत कुलकर्णी उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना, श्री. सचिन इंगेवाड सपोनि दहशतवाद विरोधी शाखा, जालना, श्री. योगेश चव्हाण पोउपनि पो.स्टे. सायबर यांनी सविस्तर मार्गदर्शन करुन पोलीस पाटील मार्गदर्शिका या पुस्तकाचे वाटप करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण शिबीरास जालना उपविभागातील १३० नवनियुक्त महिला व पुरुष पोलीस पाटील यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला होता.

# गारपिटीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या - आ. अमित देशमुख

लातूर । प्रतिनिधी

लातूर, धाराशिव जिल्ह्यांसह मराठवाड्यातील अनेक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस गारपिटीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आ पत्तीमुळे फळबागा, भाजीपाला आणि रब्बी पिके उद्ध्वस्त झाली असून, प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी केली आहे.

आ. अमित देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या अगोदर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाला होता, ज्यातून रब्बी पिके कशीबशी वाचली होती. मात्र, काल १७ मार्च रोजी पुन्हा झालेल्या गारपिटीमुळे हाताशी आलेली पिके पूर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने काढणीला आलेली ज्वारी, गहू, हरभरा आणि करडई या पिकांचा समावेश आहे. तसेच आंबा, द्राक्ष बागा आणि भाजीपाल्याचीही मोठी नासाडी झाली आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन प्रशासनाला तत्काळ पंचनाम्यांचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांना ठोस दिलासा द्यावा. हवामान खात्याच्या अंदाजानुसार २०-२१ मार्चपर्यंत विदर्भआणि मराठवाड्यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपीट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शेतकरीवर्गामध्ये व्यापक जनजागृती करावी, जेणेकरून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकरी पूर्वतयारी करू शकतील, असेही आमदार अमित देशमुख यांनी प्रशासनाला सुचवले आहे.

# स्वामी विवेकानंद उद्यानात महात्मा बसवेश्वरांचा अश्वारूढ पुतळा दाखल

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महापालिकेकडून हडको परिसरातील स्वामी विवेकानंद उद्यानात उभारण्यात येणारा महात्मा बसवेश्वरांचा भव्य अश्वारूढ पुतळा मोठ्या जल्लोषात दाखल झाला. १६ फूट उंचीचा हा पुतळा राज्यातील सर्वात मोठा ब्रांझ पुतळा ठरत असून, लवकरच अनावरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

महात्मा बसवेश्वरांचा भव्य पुतळा उभारण्याची मागणी शहरातील समाजबांधवांकडून अनेक वर्षांपासून होत होती. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेने स्वामी विवेकानंद उद्यानाची जागा निश्चित केली होती. मात्र पुतळ्याच्या निर्मितीसाठी कालावधी लागल्याने काम टप्प्याटप्प्याने पुढे सरकत होते. चिकलठाणा येथील मडिलगेकर आर्ट गॅलरीमध्ये गेल्या दीड वर्षांपासून या पुतळ्याचे काम सुरू होते. अखेर पुतळा पूर्ण झाल्यानंतर तो विशेष क्रेनच्या साहाय्याने हडको येथील उद्यानात आणण्यात आला. वजन आणि



उंची लक्षात घेता वाहतुकीसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. चिकलठाणा ते हडको हा प्रवास पूर्ण करण्यासाठी सुमारे चार तासांचा अवधी लागला. पुतळा उद्यानात पोहोचताच महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तो नियोजित चबुतऱ्यावर सुरक्षितपणे स्थापित करण्यात आला. यावेळी विविध राजकीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी पुतळ्याची पाहणी करून समाधान व्यक्त केले. लवकरच या पुतळ्याचे भव्य अनावरण करण्यात येणार असून, त्यासाठी महापालिका स्तरावर तयारी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.


CIVIL COURT SENIOR DIVISION COURT BEED.

IN THE COURT OF Manikrao Rajaram Satav 7th Jt Civil Judge Senior Division Beed, Bid, Beed

Civil M.A./66/2026 Saraswati Rajaram Wale Vs Nil NEXT DATE: 24-04-2026

To,

अर्जदार : १ सरस्वती भ्र. राजाराम वळे वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. तिरुपती नगर, बीड ता. जि. बीड. २ श्रीकृष्ण पि. राजाराम वळे, वय २२ वर्षे, वांदा शिक्षण, रा. तिरुपती नगर, बीड ता. जि. बीड. ३ ऋतुजा पि. राजाराम वळे, वय २५ वर्षे, धदां शिक्षण, रा. तिरुपती नगर, बीड ता. जि. बीड.४. सुशिला भ्र. बाजीराव वळे वय ७८ वर्षे, धदा घरकाम, रा. आनंदवाडी ता. जि. बीड.

विरुध्द गैरअर्जदार निरंक

मागणी: बॉम्बे रेग्यलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मयत राजाराम पि. बाजीराव वळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत राजाराम पि. बाजीराव वळे हे दिनांक दि. २४/११/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले असून अर्जदार मयत मयत राजाराम पि. बाजीराव वळे यांचे वारस आहेत. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत मयत राजाराम पि. बाजीराव वळे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी. आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझ्या राहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४/०४/२०२६ रोजी आहे.

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



**महाराष्ट्र शासन व वन विभाग**
**तहसीलदार, मामलेदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड**
(एम.ए.जी. विभाग)
दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६
Email id-tahshildarambad@gmail.com
जा.क्र. २०२६/सेतु/कावि-४९
दिनांक-२०१/०३/२०२६

**जाहिर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय अर्जदार श्रीमान / श्रीमती सरफराज गफ्फार बागवान रा. सुखापुरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | सरफराज गफ्फार बागवान | स्वतः | १०/०४/१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे. तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी आज दिनांक- २०/०३ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**तहसिलदार तथा**
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड


# भूमी अभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कारभाराचा वाढता आलेख

## भालगाव येथील घुले बंधूंच्या शेतजमिनीत अतिक्रमण करत मोजणीत केला फेरफार

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील शेतकरी हरी पांडुरंग घुले व वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेत जमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार केली आहे गट नंबर ४२४ व ४२५ व ३९१ शेत जमिनीतील वहिवाट व बांधावरील हद्दीखुणा पोलिस संरक्षणामध्ये २०/१२/२०२४ व २०/६/२०२५ रोजी क्रमशः दाखवल्या होत्या त्या हद्दी खुणा नंतर एकनाथ घुले यांनी बुजून टाकल्या गट नंबर ४२४ व ४२५ मोजणी नकाशा मधील वहिवाट व बांध यामध्ये तफावत दिसत आहे वरील गट नंबर ४२४ व ४२५ तपासून मिळाव्यात व गट नंबर ३९१ ची पोटहिस्सा मोजणी २२/१२/२०२४ रोजी झालेल्या हद्द कायम मोजणी नुसार करावी यासंदर्भात ०९/१२/२०२५ रोजी जिल्हा भूमीअभिलेख यांच्याकडे अपील केलेले असल्याने तसेच पाथर्डी दिवाणी न्यायालयात आरसीएस १४२ क्रमाने सदरचा दावा प्रलंबित आहे गट नंबर ४२४ व ४२५ आणि ३९१ पोलीस संरक्षणामध्ये हद्दीखुणा दाखवल्या त्या हद्दीखुणा २०/०३/२०२६ रोजी दाखवण्यात येणाऱ्या हद्दीखुणा यात तफावत आढळल्याने वहिवाट आणि बांध येथे कंपाऊंड करण्यास हरी घुले आणि वसंत घुले यांनी हरकत घेतली आहे.

पाथर्डी भूमि अभिलेख कार्यालयातील कर्मचारी सुनील साळवे हे नाशिक येथून भूमिअभिलेख विभागातून निलंबित कर्मचारी आहेत पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयात एजंटगिरीचा सुळसुळाट वाढला असून एजंट विनोद हा सुनील साळवे हा मोजणीत फेरफार करणे शेतकऱ्यांच्या वहिवाट बांध इतर मोजणी व भूमीअभिलेख कार्यालयातील महत्त्वाचे दाखले यासाठी एजंट विनोदचा वापर करत असल्याच्या चर्चा आहेत.

पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांचा आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ व २०/०६/२०२५ या तारखेला केलेल्या हद्दीखुणा व २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा व गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत आहे यामुळे या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अप्पर सचिव विकास खारगे भूमिअभिलेख उपसंचालक महेश इंगळे यांच्याकडे पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांची चौकशी लावून त्यांना निलंबित करण्याची मागणी करणार आहे - वसंत घुले (पीडित शेतकरी भालगाव)

cmyk

cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

रविवार दि.२२ मार्च २०२६ ६

# दै.राज्य लोकतंत्रच्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांची उपस्थिती











This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# चेक बाऊन्स झाला तर थेट कोर्टाची पायरी चढावी लागणार; पुणे महापालिकेचा मोठा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

मिळकतकराचा धनादेश बाउन्स झाल्यास महापालिका थेट मिळकतकरधारकावर खटले दाखल करणार आहे. एवढेच नव्हे, यापुढे थकबाकीदारांना केवळ नोटिसा न देता मिळकतींवर बोजा चढवला जाणार आहे. सर्वसामान्य नागरिकांपासून ते आस्थापना, मोठ्या कंपन्या, सरकारी कार्यालये अनेकांचे मिळकतकर थकीत आहे. ही रक्कम काही शेकडा कोटी रुपयांपर्यंत आहे. आकारणी आणि कर संकलन कार्यालयामार्फत प्रतिवर्षी मिळकतकर देयकांचे वाटप करण्यात येते.



जवळच्या क्षेत्रीय कार्यालयात, तसेच मुख्य इमारत पुणे महापालिका येथील नागरी सुविधा केंद्रात धनादेशाद्वारे मिळकतकर भरणा नागरिक करतात. मात्र, अनेकांचे धनादेश बाउन्स होतात. त्यांची संख्याही हजारांवर आहे. सन २०२५-२६ या एकाच वर्षात ८९.२ कोटी रुपयांचे सुमारे ४ हजार २०१ धनादेश बाउन्स झाले आहेत. त्यांना नोटिसा देऊन महापालिकेच्या कर आकारणी-कर संकलन विभागाने वसुली करण्यास सुरुवात केली आहे. त्यातील ३ हजार ३३० जणांनी पैसे भरले असून, अद्याप ८७१ जणांनी पैसे भरलेले नाहीत. ही रक्कमही तब्बल ३२.३ कोटी रुपये असल्याने ही कारवाई प्रस्तावित केली आहे. १ एप्रिल २०२५ पासून अनेक नागरिकांनी मिळकतकराचा धनादेशाद्वारे भरणा केला आहे. तथापि, सदर भरणा करताना धनादेशातील त्रुटीमुळे, तसेच नागरिकांच्या बँक खात्यात असलेल्या अपुऱ्या शिलकीमुळे, तसेच इतर तांत्रिक अडचणीमुळे धनादेश वटले नाहीत. अशा मिळकतधारकांना नोटीस बजावल्या आहेत; परंतु सदर मिळकतधारकांनी अद्याप भरणा केलेला नाही. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याने ही कारवाई करण्यात येणार आहे.

# हळदीच्या पाकिटांतून गांजाची तस्करी; पोलिसांकडून दोन भावांना बेड्या, १६ किलो साठा जप्त!

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील उच्चभ्रू बाणेर परिसरात हळदीच्या पाकिटांच्या आडून गांजाची विक्री करणाऱ्या रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात बाणेर पोलिसांनी अभिषेक भिका बोरसे आणि अक्षय भिका बोरसे या दोघांना अटक करत तब्बल १६ किलो गांजा जप्त केला आहे.





याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर परिसरात दोन तरुण दुचाकीवरून गांजा विक्रीसाठी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी महापालिकेच्या जलतरण तलावाजवळ सापळा रचला. संशयितांना अडवून चौकशी केली असता त्यांच्या ताब्यातील पिशवीत हळदीची पाकिटे आढळून आली. या पाकिटांची तपासणी केल्यानंतर पोलिसांनाही धक्का बसला. कारण हळदीच्या नावाखाली या पाकिटांमध्ये गांजा लपवून ठेवण्यात आला होता. सुरुवातीला पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ३ किलो गांजा जप्त केला. चौकशीदरम्यान आरोपींनी पिंपरी-चिंचवड येथील त्यांच्या घरात आणखी अमली पदार्थ साठवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकत आणखी १३ किलो गांजा जप्त केला. अशा प्रकारे एकूण १६ किलो गांजा हस्तगत करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी खासगी कंपनीत नोकरी करत असल्याची माहिती समोर आली असून ते हळदीच्या पाकिटांचा वापर करून गांजाची विक्री करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बाणेर पोलीस करत आहेत.

# रुपाली चाकणकरांची बदनामी करु नका'; पुण्यातील काँग्रेस नेत्याचे वक्तव्य

पुणे । प्रतिनिधी

नाशिकमधील कॅप्टन अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना राजीनामा द्यावा लागला. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून त्याची दखल राज्य सरकारने घेतली आहे. काल रात्री उशिरा रुपाली चाकणकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्त केला. यानंतर पुण्यातील काँग्रेस नेत्याची प्रतिक्रिया समोर आली असून, काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी रुपाली चाकणकर यांची पाठराखण केली आहे.



रुपाली चाकणकर यांची बदनामी करू नका, गरज पडल्यास त्यांना काँग्रेसमध्ये घेण्यासाठी शिफारस करू, असे वक्तव्य अरविंद शिंदे यांनी केले आहे. तसेच नाशिकच्या खरातच जे प्रकरण आम्हाला दिसतय. त्यामध्ये खरातवर कारवाई झाली पाहिजे. अशा व्यक्तीला बाहेर सोडलाच नाही पाहिजे ही आमची पहिली भूमिका आहे. पण खरातला बाजूला ठेऊन रुपाली चाकणकर यांच्यावर जो निशाणा साधला जातोय. यात स्पष्टपणे राजकीय गणित दिसत आहेत, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्ष असताना दखल घेतली नसेल, कामात कुचराई केली असेल तर त्यावर बोलले पाहिजे. ज्यावेळेला तक्रारी दाखल झाल्या, त्यावेळी बोललं पाहिजे होतं. आज खरातला जे धरलं आहे. खरातचं जे षडयंत्र चालू आहे, पोलीस डोळे बंद करुन होते का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. यानंतर काँग्रेसचे अतुल लोंढे, वरिष्ठ प्रवक्ते, महाराष्ट्र काँग्रेस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी अरविंद शिंदेंनी रुपाली चाकणकरांच्या संदर्भात जी भूमिका मांडली ती त्यांच वैयक्तिक मत आहे, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये दोन मतप्रवाह असल्याची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, अरविंद शिंदेंनी रुपाली चाकणकरांच्या संदर्भात जी भूमिका मांडली ती त्यांच वैयक्तिक मत आहे. काँग्रेस पक्षाची भूमिका अगदी स्पष्ट आहे. महाराष्ट्राचा एपस्टीन खरात याने जे काही कृत्य केलेलं आहे ते माफीला लायक नाही. रुपाली चाकणकरांचा आणि त्यांचा संबंध स्पष्टपणे दिसतोय. चाकणकर यांच्यावर या महाराष्ट्रातल्या महिलांच्या सुरक्षेची आणि त्यांच्या काळजीची जबाबदारी आहे. त्या जबाबदारीपासून त्या दूर झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांचा राजीनामा झालाच पाहिजे. त्यांना पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही ही काँग्रेसची स्पष्ट भूमिका आहे.

# कोंढव्यात टोळक्यांकडून मारहाण अन् वाहनांची तोडफोड; दहशत माजविणाऱ्या गुंडांचा खाकी वर्दीने उतरवला माज

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा बुद्रुक परिसरात मंगळवारी रात्री काही तरुणांच्या टोळक्याने केलेल्या दहशतीच्या प्रकारानंतर कोंढवा-येवलेवाडी पोलिसांनी तात्काळ कडक कारवाई करत परिसरात धाक निर्माण केला आहे. या कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकींवरून आलेल्या सुमारे १२ जणांच्या टोळक्याने परिसरात बेफाम वाहन चालवत गोंधळ घातला. यावेळी त्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करत मारहाण केली.



या घटनेत बँक कर्मचारी मयूर गायकवाड यांच्यावर कमरेच्या पट्ट्याने हल्ला करण्यात आला. त्यानंतर समोरून येणाऱ्या सायपन शेख (वय १८) या तरुणालाही आरोपींनी मारहाण केली.

सायपन हा कुरिअर सेवेत कार्यरत असून त्याच्या छातीवर जोरदार प्रहार करण्यात आला. घटनेनंतर मयूर गायकवाड यांनी आरोपींचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपी दुचाकींवरून पसार झाले. मारहाणीनंतरही आरोपी थांबले नाहीत. त्यांनी गल्ली क्रमांक ११ मधील पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड केली. स्थानिक रहिवासी महामुनी यांच्या दुचाकीचे नुकसान करण्यात आले. नागरिकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ करत दहशत निर्माण केली. या प्रकरणात तक्रारदार आणि स्थानिकांच्या मदतीने काही संशयितांची ओळख पटली असून त्यात ओंकार पांचाळ, सोन्या जाधव, हर्षल, अभि दीक्षित, प्रसाद शिंदे यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी कोंढवा बुद्रुक परिसरातीलच रहिवासी असल्याचे समोर आले आहे. या घटनेची गंभीर दखल घेत कोंढवा-येवलेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ 'कोम्बिंग ऑपरेशन' राबवले. संशयित गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, रस्त्यावर दहशत माजवणाऱ्या आणि कायदा हातात घेणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून परिसरात कायद्याचा धाक निर्माण केला जाईल.

# अपघात नव्हे, अमानुष छळ करून 'खूनच'!

## वानवडीतील 'त्या' मृत्यूचे धक्कादायक वास्तव समोर

पुणे । प्रतिनिधी

वानवडीत एका तरुणाचा अमानुष छळ करून खून झाला. आरोपींनी हा प्रकार लपवण्यासाठी अपघाताचा बनाव रचण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, एका गुप्त फोनमुळे पोलिसांनी हा प्रकार उघड करत चार सख्या भावांना अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये गौरव माजी (२२), सचिन माजी (२३), मोनू माजी (२६) आणि बंटी माजी (१८ सर्व रा. शंकर मठ, पावर सोसायटी, वैदुवाडी, हडपसर) यांचा समावेश आहे. हे चौघेही भाऊ इव्हेंट मॅनेजमेंटचे काम करतात. तसेच त्यांच्या घरी कबुतराच्या ढाबळीही आहेत.

घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव रुपेश धनराज शिंदे (१९, रा. मोशी) असे असून, तो शिक्षण घेत होता. याप्रकरणी त्याचे वडील धनराज शिंदे यांनी वानवडी ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार बुधवारी (दि. १८) पहाटे अडीच ते तीनच्या सुमारास रुपेश मित्र अजय टिंगरेसह दुचाकीवरून मोशीकडे जात होता. हडपसरमधील शंकर मठ परिसरात ते लघुशंकेसाठी थांबले. जवळच्या कॅनॉललगतच्या मोकळ्या जागेत ते गेले असता, तेथील कबुतरांच्या पिंजऱ्याजवळ कुत्रे भुंकू लागले.

संशय आल्याने काही रहिवाशांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. भीतीपोटी दोघे पळू लागले. मात्र, जिनमाता मोटर्ससमोर रुपेशचा पाय घसरला आणि तो खाली पडला. त्याच क्षणी तो आरोपींच्या तावडीत सापडला. संशयितांनी रुपेशला पकडून लाकडी बॅट आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. इतक्यावरच न थांबता त्याला कबुतरांच्या ढाबळीला बांधून ठेवण्यात आले. रात्रभर छळ सहन केल्यानंतर सकाळी सहा वाजता रुपेशला उलट्या होऊ लागल्या आणि तो बेशुद्ध पडला.घाबरलेल्या आरोपींनी बचावासाठी अपघाताचा बनाव रचला. त्यांनी रुपेशला प्रथम जवळच्या रुग्णालयात आणि नंतर ससूनला नेले. मात्र, ससूनमध्ये पोहोचण्यापूर्वीच रुपेशचा मृत्यू झाला होता. खंडणी विरोधी पथकाचे पोलीस हवालदार नितीन मुंढे यांना त्यांच्या खबऱ्याने घटनेची माहिती दिली. पोलिसांनी रुग्णालयात धाव घेत चौकशी केली.सुरुवातीला अपघाताची कथा सांगणाऱ्या संशयितांनी पोलिसांच्या चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. कबुतर चोरीच्या संशयातून त्याला मारहाण केल्याची कबुली दिली.ही कारवाई पोलिस उपायुक्त निखील पिंगळे, पोलिस निरीक्षक राम राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाई करणाऱ्या पथकात पोलीस उपनिरीक्षक गौरव देव, हवालदार नितीन मुंढे, कानिफनाथ कारकेले, रविंद्र रोकडे, अमोल राऊत, दिलीप गोरे यांचा समावेश होता.

# स्वारगेट-कात्रज मेट्रोचा विस्तार शिवापूर रिंगरोडपर्यंत

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट-कात्रज मेट्रोमार्ग पुढे शिवापूर टोलनाका परिसरातून प्रस्तावित रिंग रोडपर्यंत वाढविण्यासंबंधीच्या मागणीच्या प्रस्तावास शहर सुधारणा समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.




भाजपच्या नगरसेविका वर्षा तापकीर यांनी हा प्रस्ताव दिला होता. त्यास मंजुरी देण्यात आल्याचे शहर सुधारणाच्या अध्यक्षा स्मिता वस्ते यांनी सांगितले. दक्षिण पुणे, कात्रज परिसर, तसेच शिवापूर टोलनाका आणि प्रस्तावित रिंग रोडलगत झपाट्याने वाढणारी वसाहत व वाढता वाहतूक ताण लक्षात घेता मेट्रो विस्तार अत्यंत आवश्यक आहे.

या प्रकल्पामुळे नागरिकांना जलद, सुरक्षित व पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे. अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव मुख्य सभेकडे शिफारस केला आहे, अशी माहिती वस्ते यांनी दिली. दरम्यान, सदस्यांच्या मागणीवरून हा प्रस्ताव मंजूर केला. या मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार झालेला नाही. तसेच प्रशासनाकडून त्यावर कार्यवाही झालेली नाही.

# उरुळी कांचनमध्ये गॅस सिलिंडरसाठी ४५ दिवसांची प्रतीक्षा

उरुळी कांचन: मध्य-पूर्व आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन तेल आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर गॅस वितरण सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने शहरी भागात २५ दिवस, तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचा बुकिंग कालावधी निश्चित केला आहे. मात्र, वेगाने शहरीकरण झालेल्या हवेली तालुक्याला अद्याप 'ग्रामीण' निकष लावले जात असल्याने येथील नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणावर नोकरदार आणि स्थायिक नागरिक वास्तव्यास आहेत. या भागाचे पूर्णतः शहरीकरण झाले असतानाही गॅस वितरणासाठी ४५ दिवसांची मर्यादा लागू आहे. एकदा गॅस बुक केल्यानंतर दीड महिन्याने सिलिंडर मिळत असल्याने गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. महापालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्राप्रमाणे येथेही २५ दिवसांचा कालावधी निश्चित करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. गॅस वितरण व्यवस्था ऑनलाईन करून थेट कंपन्यांशी जोडल्याने पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, घरगुती वापराच्या गॅससाठी वर्षभर ओरड सुरूच असते. दुसरीकडे, व्यावसायिक कारणांसाठी घरगुती सिलिंडरचा काळाबाजार सर्रास सुरू असल्याचे चित्र आहे. या प्रकारांकडे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे



दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. हवेली तालुक्यातील वाढती लोकसंख्या आणि शहरी स्वरूप विचारात घेता, जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून येथील गॅस वितरणाचा कालावधी २५ दिवसांपर्यंत कमी करावा. तसेच व्यावसायिक कामांसाठी होणारा घरगुती गॅसचा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठी कडक पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# समलैंगिक संबंधांना विरोध; १२ अन् १० वर्षाच्या दोन अल्पवयीन मुलाला क्रूरपणे संपवलं; चक्रवून टाकणारी पुण्यातील घटना

पुणे । प्रतिनिधी


पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील दहिवडी गावात १७ मार्चला १२ वर्षाच्या अल्पवयीन मुलाची हत्या झाली होती. ही हत्या अक्षय दत्तात्रय मांजरे या २२ वर्षांच्या तरुणाने समलैंगिक संबंधना विरोध केल्याने केल्याचं पोलीस तपासात उघड झालं आहे. मात्र या हत्येचा तपस करताना आरोपी अक्षय मांजरेने मागील वर्षी २१ जूनला अशाच प्रकारे समलैंगिक संबंधांना विरोध केल्याने ११ वर्षांच्या मुलाची देखील हत्या केली होती असं तपासात उघड झालं आहे. विशेष म्हणजे या दोन्ही हत्या केल्यानंतर आरोपी अक्षय मांजरे हा त्या ठिकाणी गर्दीचा भाग म्हणून उभा होता.

२१ जून २०२५ ला त्याने समलैंगिक संबंधांना विरोध करणाऱ्या ११ वर्षाच्या मुलाचा डोक्यात दगड घालून खून केला. मात्र त्या हत्येचा तपास पोलिसांनी व्यवस्थित केला नाही असा ग्रामस्थांचा आरोप आहे. अक्षय मांजरेवर संशय असल्याने त्याची जुजबी चौकशी करून त्यावेळी त्याला सोडून देण्यात आलं. त्यानंतर १७ मार्च २०२६ ला त्याने पुन्हा १२ वर्षाच्या एका मुलावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याही मुलाने विरोध केल्याने अक्षय मांजरेने त्याचाही डोक्यात दगड घालून खून केला. या दोनही हत्या करून आपला त्या हत्येशी कोणताही संबंध नाही हे दाखवण्यासाठी तो तपासासाठी पोलीस घटनास्थळी आल्यानंतर तिथे उपस्थित राहत होता. अखेर पोलिसांनी गावातील अनेकांची कसून चौकशी करायचं ठरवलं. त्यावेळी अक्षय मांजरेच्या सांगण्यामध्ये पोलिसांना विसंगती जाणवू लागली आणि या दोन हत्येचा उलगडा झाला असल्याचं समोर आलं आहे. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी याबाबत माहिती देताना सांगितलं की, शिरूर तालुक्यातील दहीवडी गावात घडलेल्या एका धक्कादायक हत्या प्रकरणाची माहिती दिली आहे. शिरूर तालुक्यातील दहीवडी गावात १२ वर्षांच्या मुलाचा मृतदेह उसाच्या शेतात, एका विहिरीजवळ आढळून आला. हा मुलगा आदल्या दिवशी सकाळी १०:३० - ११:०० च्या सुमारास घरातून बाहेर गेला होता, पण सायंकाळी ६ वाजेपर्यंत घरी परतला नाही. त्यानंतर नातेवाईकांनी शोध घेतला असता त्याचा मृतदेह सापडला. मुलाच्या डोक्यात गंभीर जखम होती आणि शरीरावर इतर ठिकाणीही ओरखड्यांच्या खुणा होत्या. याप्रकरणी पोलिसांनी तातडीने BNS कलम १०३ (१) नुसार हत्येचा (Murder) गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक पोलीस स्टेशन आणि क्राईम ब्रँचची पथके काल रात्रीपासूनच आरोपीच्या शोधात होती.पोलिसांनी या गुन्ह्यात एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. काही महिन्यांपूर्वी याच ठिकाणी अशाच पद्धतीने एका १० वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. सध्याच्या प्रकरणाचा आणि त्या जुन्या घटनेचा काही संबंध आहे का, याचाही पोलीस सखोल तपास करत आहेत.

# 'बाबू भाई'चा पोलिसांना चकवा! बंगाल ते ईशान्य भारत पालथे घातले, तरीही पोलीस रिकाम्या हाती

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील बुधवार पेठेतील देहव्यापार प्रकरणात मुख्य संशयित असलेल्या बाबू भाई ऊर्फ पापा शेख या कथित बांगलादेशी नागरिकाचा शोध अद्याप लागलेला नसून, पुणे पोलिसांची शोधमोहीम निष्फळ ठरत आहे. पश्चिम बंगाल तसेच ईशान्येकडील राज्यांमध्ये छापेमारी करूनही पोलिसांच्या हाती कोणताही ठोस धागा लागलेला नाही. या प्रकरणातील त्याचा साथीदार संजय एस हाही सध्या फरार असून, दोघेही पोलिसांच्या रडारवर आहेत.



फरासखाना पोलिसांनी १९ फेब्रुवारी रोजी बुधवार पेठेतील कुंटणखान्यावर टाकलेल्या छाप्यात ११ बांगलादेशी महिलांची सुटका केली होती. या कारवाईनंतर अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक कायदा (पीटा) अंतर्गत चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले असून, या सर्व गुन्ह्यांमध्ये बाबू भाई आणि संजय एस यांना मुख्य आरोपी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. बाबू भाईला नोव्हेंबर २०२४ मध्ये अटक करण्यात आली होती.

मात्र, जानेवारी २०२५ मध्ये येरवडा कारागृहातून जामिनावर कारागृहातून सुटका झाल्यानंतर त्याने पुन्हा देहव्यापाराशी संबंधित एजंट म्हणून काम सुरू केले.

दरम्यान, बाबू भाईचा माग काढण्यासाठी पोलिसांची विशेष पथके पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पाठवण्यात आली होती. तरीही तो पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्याच्या नातेवाइकांकडे आणि मित्रमंडळींकडेही चौकशी करण्यात आली. त्याने सर्व संपर्क साधणे बंद केल्याने माग लागणे कठीण झाले आहे. बाबू भाईच्या तिन्ही बायका बुधवार पेठेत असून, त्या पीडित महिलांना धमकावून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत होत्या. तसेच त्यांना कुंटणखान्यातून बाहेर पडून देत नव्हत्या अशी माहिती पोलिसांनी दिली . बाबू भाईचे सुमारे २० वर्षांपासून बुधवार पेठेत वास्तव्य आहे. खादी आणि खाकी दोन्हीशी त्याचे चांगले संबंध होते. नोकरी आणि विवाहाच्या आमिषाने ते बांग्लादेशातून मुली आणत होता. मागील २० वर्षे त्याचे बुधवार पेठेत चांगलेच प्रस्थ होते.